




# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२९६ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. २३ डिसेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## सोमनाथ सूर्यवंशीची पोलिसांनी केली हत्या

### पीडित कुटुंबीयांशी संवाद साधल्यानंतर राहुल गांधी यांचा आरोप : फडणवीस खोटे बोलल्याचाही घणाघात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३परभणी**

परभणी येथे गत १० डिसेंबर रोजी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना झाली होती. या घटनेच्या १२ दिवसांनंतर काँग्रेस नेते राहुल गांधी आज परभणीत येऊन या घटनेत बळी गेलेल्या सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. यावेळी त्यांनी सोमनाथ यांची पोलिसांनी हत्या केल्याचा गंभीर आरोप केला. तसेच या प्रकरणी न्यायाचीही मागणी केली. राहुल यांनी पीडित कुटुंबीयांशी अगदी जमिनीवर बसून संवाद साधला.लोकसभेतील विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी हे २.३० वाजेच्या सुमारास परभणी शहरात दाखल झाले. त्यानंतर सोमनाथ सूर्यवंशीच्या कुटुंबीयांची भेट घेत त्यांचे सांत्वन केले. यावेळी सोमनाथच्या आईने टाहो फोडत माझ्या मुलाच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी खा. राहुल गांधी यांच्याकडे केली.



परभणी शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा परिसरात संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना करण्यात आली. त्यानंतर शहर व जिल्ह्यात मोठ्या आंदोलन झाले. या आंदोलनानंतर पोलिसांनी अनेकांना ताब्यात घेतले. त्यामध्ये मयत सोमनाथ सूर्यवंशी हा देखील होता. सोमनाथला न्यायालयीन कोठडी सुनावल्यानंतर त्याचा त्यामध्ये मृत्यू झाला. सोमनाथ सूर्यवंशीच्या कुटुंबियांचे सांत्वनपर भेट घेण्यासाठी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे परभणी शहरात दाखल झाले. त्यानंतर २.३० वाजेच्या सुमारास त्यांनी सोमनाथ सूर्यवंशी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेत सांत्वन केले. यावेळी महाराष्ट्र प्रभारी रमेश चंनिथल्ला, प्रदेशाध्यक्ष आ. नाना पटोले, बाळासाहेब थोरात, प्रणिती शिंदे, यशोमती ठाकूर, विजय वडेट्टीवार, प्रज्ञा सातव, संजय जाधव, नितीन राऊत, अमित देशमुख आदींचे उपस्थिती होती. कलर बॉक्स आम्ही राजकारण करत नाही

यावेळी पत्रकारांनी या प्रकरणाचे राजकारण होत असल्यासंबंधी प्रश्न केला. त्यावर राहुल गांधी संतापून म्हणाले, हे राजकारण नाही. या प्रकरणी कोणतेही राजकारण केले जात नाही. येथे मर्डर झाला असून, न्याय झाला पाहिजे. योग्य ती कारवाई झाली पाहिजे, असे ते म्हणाले.

**हा स्पष्टपणे मर्डर आहे – राहुल गांधी**

आरएसएसची विचारधारा ही संविधान संपवण्याची आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून या घटनेतील आरोपींना कठोर शिक्षा झाली पाहिजे. मी या प्रकरणाच्या तपासावर समाधानी नाही. पीडितांना जबर मारहाण करण्यात आली आहे. हत्या करण्यात आली आहे. हा स्पष्टपणे मर्डर आहे, असे राहुल गांधी म्हणाले.

## धनंजय मुंडे, वाल्मीक कराडची व्यावसायिक भागीदारी

### जितेंद्र आव्हाड यांचा दावा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३बीड**

बीडमधील संतोष देशमुख हत्याकांडाप्रकरणी वादाच्या भोवऱ्यात सापडलेल्या वाल्मीक कराड यांचे मंत्री धनंजय मुंडे यांच्याशी व्यावसायिक भागिदारी असल्याचा दावा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. आव्हाड यांनी यासंबंधी या दोघांची भागीदारी असल्याचा एक स्क्रीनशॉट पोस्ट केला आहे. यामुळे या दोघांतील कथित परस्पर संबंध पुन्हा एकदा राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरले आहेत.



बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची गत ९ डिसेंबर रोजी निर्घृण हत्या करण्यात आली होती. त्यांचे प्रथम अपहरण करण्यात आले. त्यानंतर त्यांची हत्या करण्यात आली. या प्रकरणी एकूण ७ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यापैकी ४ जणांवर आतापर्यंत अटक करण्यात आली आहे. त्यातच या प्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय यांचे विश्वासू वाल्मीक कराड यांचे नाव आल्यामुळे हे दोघेही कथितपणे अडचणीत सापडलेत.

## छगन भुजबळांनी घेतली फडणवीसांची भेट : मोठा निर्णय घेण्याचे संकेत

### मुख्यमंत्र्यांनी ओबीसींचे नुकसान होऊ देणार नसल्याची ग्वाही दिल्याचा दावा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३मुंबई**

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी मंत्री छगन भुजबळ सोमवारी सकाळीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. दोघांत जवळपास अर्धा तास चर्चा झाली. त्यानंतर ते आपल्या समर्थकांशी बोलण्यासाठी निघून गेले. भुजबळ राज्य मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस विशेषतः उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर नाराज आहेत. त्यामुळे फडणवीस यांच्यासोबतच्या बैठकीनंतर भुजबळ एखादा मोठा निर्णय घेतात का? याकडे अवघ्या राज्याचे लक्ष लागले आहे.

राज्य मंत्रिमंडळाचा १५ डिसेंबर रोजी विस्तार झाला. त्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांना स्थान मिळाले नाही. यामुळे भुजबळ अजित पवारांवर प्रचंड नाराज झालेत. या प्रकरणी त्यांनी अजित पवारांसह सुनील तटकरे व प्रफुल्ल पटेल यांच्यावर जाहीरपणे टीका केली. तसेच ओबीसीच्या मुद्यावरून राज्यभर रान पेटवण्याचा इशाराही दिला. त्यातच त्यांनी 'जहां नहीं चैना वहां नही रहना' असे म्हणत एकप्रकारे त्यांनी राष्ट्रवादीला सोडचिठ्ठी देण्याचेच संकेत दिलेत. त्यानंतर समता परिषदेतील त्यांच्या सहकाऱ्यांनीही त्यांना राष्ट्रवादीला सोडून भाजपमध्ये जाण्याचा सल्ला दिला आहे. या पार्श्वभूमीवर भुजबळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सागर बंगल्यावर जाऊन भेट घेतली आहे.

**उभयंतांत बराच वेळ चर्चा**

सागर बंगल्यावर छगन भुजबळ व देवेंद्र फडणवीस यांच्यात जवळपास अर्ध्या तास चर्चा झाली. या चर्चेचा तपशील अद्याप बाहेर आला नाही. पण दोन्ही नेत्यांत भुजबळांना मंत्रिपद



नाकारणे व त्यानंतरच्या त्यांच्या राजकीय वाटचालीवर चर्चा झाल्याचे सांगितले जात आहे.

**मुख्यमंत्र्यांची ओबीसींचे नुकसान होऊ देणार नसल्याची ग्वाही**

मुख्यमंत्र्यांची भेट घेतल्यानंतर छगन भुजबळांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी मुख्यमंत्र्यांनी आपल्याला ओबीसींचे नुकसान होऊ देणार नसल्याची ग्वाही दिल्याचे सांगितले. ते म्हणाले, मी आणि समीर भुजबळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. त्यांच्याशी सामाजिक व राजकीय आदी अनेक मुद्यांवर चर्चा केली. वर्तमान पत्रातून आणि टीव्हीच्या माध्यमातून बऱ्याच गोष्टी मी पाहिल्या व ऐकल्याचे ते म्हणाले. विशेषतः ओबीसींच्या पाठबळामुळेच महायुतीचा महाविजय झाल्याचेही त्यांनी यावेळी मान्य केले.

मुख्यमंत्र्यांनी कोणत्याही परिस्थितीत ओबीसींचे नुकसान होणार नाही याची काळजी घेण्याची ग्वाही दिली आहे. यासाठी त्यांनी पुढील मार्ग काढण्यासाठी ८-१० दिवसांचा वेळ मागितला आहे. आम्ही पुन्हा भेटून ओबीसींच्या मुद्यावर साधक - बाधक विचार करणार असल्याचा निरोप ओबीसी नेत्यांना सांगा अशी विनंतीही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केल्याचे छगन भुजबळ यांनी यावेळी सांगितले.

## मंत्रिमंडळातून पत्ता कट होताच माजी शिक्षणमंत्री केसरकरांनी घेतलेले निर्णय बदलण्याचा डाव

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३मुंबई**

गेल्याच आठवड्यात दीपक केसरकर यांनी घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शालेय गणवेश योजनेच्या निर्णयात बदल करण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. त्यावरुन, केसरकर यांनी जाहीरपणे नाराजी व्यक्त केली होती. तसच, हा निर्णय घेण्यापूर्वी माझ्याशी चर्चा तरी करायला हवी होती, असं म्हटलं होतं. आता, केसरकर यांनी घेतलेल्या आणखी एका निर्णयात बदल करण्यात येणार असल्याचे समजते. राज्य सरकारच्या मंत्रिमंडळाचे खातेवाटप जाहीर झाले असून शालेय शिक्षणमंत्रीपदाचा पदभार दादा भुसे यांच्याकडे देण्यात आला आहे. त्यानंतर, आता पुस्तकाला वह्यांची पाने जोडण्यात



आलेल्या निर्णयावर राज्य सरकारकडून फेरविचार सुरू असल्याची माहिती आहे.

केसरकर यांच्या कार्यकाळात विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे वजन कमी व्हावे, तसंच शिकताना प्रत्येक पुस्तकात त्या त्या विषयाच्या संदर्भातील नोंदी करता याव्यात, यासाठी पाठ्यपुस्तकांना वह्यांची पाने जोडण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला होता. या निर्णयाची अंमलबजावणी राज्यातील सर्व सरकारी अनुदानित शाळांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून सुरू करण्यात आली होती.

राज्यात या निर्णयाला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाल्याने या संदर्भातील पहिली ते आठवीपर्यंतच्या सर्व पुस्तकांना वह्यांची पाने जोडण्यात आली होती. यामुळे सरकारवर आर्थिक भारदेखील पडला होता. दुसरीकडे या निर्णयाच्या माध्यमातून पुस्तकासाठी असलेल्या कंत्राटदारांना प्रचंड मोठ्या प्रमाणात आर्थिक लाभ झाला होता. त्यामुळे अनेकांनी आक्षेप नोंदवले होते. वह्यांची पाने जोडल्याने विद्यार्थ्यांत विविध विषयांची नोंद करणे, तसेच त्यासंदर्भातील आकलन क्षमता वाढल्याचे अनेक चांगले निष्कर्ष समोर आले होते. त्यामुळे या निर्णयाचे स्वागत झाले होते.

**पेचप्रसंग काय होता**

पाठ्यपुस्तकांना वह्यांची पाने जोडण्याच्या निर्णयाबद्दल फेरविचार झाल्यास प्रचंड मोठ्या प्रमाणात छपाई करून बाजारात विक्रीसाठी असलेले व बालभारतीकडे उपलब्ध असलेल्या पुस्तकांचा पेचप्रसंग निर्माण होऊ शकतो. दुसरीकडे, बालभारतीला नव्या निर्णयानुसार मोठ्या प्रमाणात नवीन पुस्तके छापावी लागतील. त्यामुळे याचा आर्थिक भारदेखील विभागावर पडण्याची शक्यता आहे.

## पुण्यात मद्यधुंद डंपर चालकाने अमरावतीच्या ९ जणांना चिरडले : २ चिमुरड्यासह एकाचा मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३पुणे**

पुण्यात काल रात्री भीषण अपघात झाला आहे. काल रात्री १२.३० च्या सुमारास पुण्यात फुटपाथवर झोपलेल्या ९ जणांना चिरडल्याची घटना घडली आहे. या अपघतात तिघांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. पुण्यातील या अपघाताने सगळीकडे खळबळ उडाली आहे.वाघोली परिसरात डंपर चालकाने हा अपघात केला आहे. डंपर चालक हा मद्यधुंद अवस्थेत होता. या अपघातात



९ जणांना चिरडले आहे. यामध्ये दोन लहान मुले असल्याची माहिती मिळाली आहे. तर सहा जण गंभीर जखमी झाले आहे. या जखमींधील तिघांची प्रकृती चिंताजनक आहे.

**या तिघांचा मृत्यू**

१. विशाल विनोद पवार वय २२ वर्ष, रा. अमरावती मूळ जिल्हा
२. वैभवी रितेश पवार वय १ वर्ष
३. वैभव रितेश पवार वय २ वर्ष

**हे ६ जण जखमी**

१. जानकी दिनेश पवार, २१ वर्षे
२. रिनिशा विनोद पवार १८
३. रोशन शशादू भोसले, ९ वर्षे
४. नगेश निवृत्ती पवार, वय २७ वर्षे
५. दर्शन संजय वैराळ, वय १८
६. आलिशा विनोद पवार, वय ४७ वर्षे

आरोपी - डंपर चालक गजानन शंकर तोट्रे याला ताब्यात घेतला असून मेडिकल करण्यासाठी रुग्णालयात नेले आहे. त्यांच्याविरोधात सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर जखमींना प्राथमिक उपचार आयनॉक्स हॉस्पिटल येथे करून ससून रुग्णालयात रवाना केले आहे. मृतदेह आयनॉक्स हॉस्पिटलमधून ससून येथे पाठवले आहेत.

**अमरावतीहून आले होते पुण्यात**

अपघातात जखमी झालेले सर्व मजूर आहेत. रविवारी रात्री ते अमरावतीहून कामानिमित्त आले होते. या पदपथावर एकूण १२ जण झोपले होते. बाकीचे लोक फूटपाथच्या बाजूला झोपडीत झोपले होते. भरधाव डंपर थेट फूटपाथवर जाऊन झोपलेल्या लोकांना चिरडले.

## मुख्यमंत्री फडणविसांचा अहिल्यानगर दौरा; अण्णा हजारेंच्या हस्ते स्वागत, पोपटराव पवारांच्या मुलाच्या विवाह समारंभास भेट

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३अहिल्यानगर**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आज अहिल्यानगर दौऱ्यावर होते. यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी डॉ. पोपटराव भागुजी पवार या यांच्या मुलाच्या विवाह समारंभास त्यांनी भेट दिलीय. डॉ. पोपटराव भागुजी पवार यांचे चि. प्रसन्न आणि चि. सौ. कां. तनुजा यांचा आज लग्नसोहळा पार पडला. या कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हजेरी लावत नवदांपत्याला शुभाशिर्वाद दिले आहेत.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशनचे वैद्यकीय महाविद्यालयाच्या हेलिपॅड येथे आगमन झाले. त्यांच्या समवेत विधान परिषद सभापती प्रा.राम शिंदे होते. जलसंपदा मंत्री (गोदावरी आणि कृष्णा खोरे विकास महामंडळ) राधाकृष्ण विखे पाटील यांनी मुख्यमंत्र्यांचे स्वागत केले. यावेळी अहिल्यानगर येथे ज्येष्ठ समाजसेवक पद्मविभूषण आदरणीय आण्णासाहेब हजारे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्वागत केलं.



यावेळी आमदार संग्राम जगताप, शिवाजीराव कर्डिले, काशिनाथ दाते, माजी मंत्री बबनराव पाचपुते, विभागीय आयुक्त डॉ.प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, पोलीस अधीक्षक राकेश ओला, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे हे उपस्थित होते.विळदघाट येथुन दुपारी १ वाजून ३० मिनिटांनी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या मेडीकल कॉलेज हेलिपॅडवरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत मंत्री विखे पाटील हे अहिल्यानगरकडे रवाना झाले. अहिल्यानगरमधील सावेडीतील नगर मनमाड रोड येथील हुंडेकरी लॉन्समध्ये डॉ. पोपटराव भागुजी पवार यांच्या मुलाला विवाह समारंभ आयोजित केलेला होता. येथे दुपारी दोन वाजता लग्नसोहळ्याला हजेरी लावली.

अहिल्यानगर येथून दोन वाजेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्री विखे पाटील हे पुन्हा विळदघाट येथे रवाना झाले. तेथून २ वाजून दहा मिनिटांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस निघाले. त्यानंतर डॉ. राधाकृष्ण विखे पाटील हे लोणीकडे रवाना झाले. मुख्यमंत्रीपदी विराजमान झाल्यानंतर अनेक महत्त्वाच्या कामांमध्ये व्यस्त असताना देखील देवेंद्र फडणवीस यांनी अहिल्यानगरमध्ये आज हजेरी लावली आहे.

## हरिनामाचा गजर! तुकोबांच्या पादुका हेलिकॉप्टरने संगमनेरमधील बोटाला मार्गस्थ



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३देहूगाव**

जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज यांच्या त्रिशतकोत्तर अमृत महोत्सवी वैकुंठगमन वर्षानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्यासाठी तुकोबांच्या पादुका श्री संत तुकाराम महाराज मंदिर येथून संगमनेर येथील बोटा या गावी नेण्यात आल्या. हरिनाम गजरात पुणे ते बोटा या मार्गावरील विविध मंदिरांवर हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी केली. श्रीक्षेत्र देहू येथून संत तुकाराम महाराजांचे ११ वे वंशज ह.भ.प. प्रशांत महाराज संभाजी मोरे देहूकर, जालिंदर गागरे यांच्या हस्ते पुष्पवृष्टी करण्यात आली. कोरेगाव येथील हेलिपॅडवरून रविवारी दुपारी दोनच्या सुमारास पादुका हेलिकॉप्टरमधून बोटा गावाकडे नेण्यात आल्या. मार्गावरील श्रीक्षेत्र आळे येथील रेडा समाधी मंदिरावर पुष्पवृष्टी केली. पादुका हेलिकॉप्टरने रविवारी चार वाजता बोट्यात पोहोचल्या.

## संपादकीय ......

# भुजबळांचे तिसरे बंड

*डिसेंबर १९९१. नागपूर येथे राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन चालू होते, तेव्हा काँग्रेसचे सरकार होते. अविभाजित शिवसेनेचे नेते मनोहर जोशी यांची विधानसभेचे विरोधी पक्षनेते म्हणून शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी निवड केली, हेच नेमके छगन भुजबळांचे (उहहरसरप इर्हीक्षिलरश्र) दुखणे होते. त्यांची मानसिकता व अस्वस्थता शरद पवार यांनी नेमकी हेरली व त्यांना शिवसेनेतून बाहेर येण्याचा मार्ग दाखवला. शिवसेनेत आक्रमक काम करूनही आपल्या मनासारखे होत नाही आणि दुसरीकडे शरद पवारांसारखा दिग्गज नेता आपल्या पाठीशी उभा आहे ही भावना भुजबळांमध्ये तीव्र बळावली व त्यांनी शिवसेनाप्रमुखांच्या विरोधातच बंडाचा झेंडा फडकवला. तेव्हा शिवसेनेचा मुंबईत जबरदस्त दबदबा होता. शिवसेनाप्रमुखांना आव्हान देणे सोपे नव्हते. शिवसैनिकांचा रोष काय असतो हे भुजबळांना चांगले ठाऊक होते. पक्षाच्या अठरा आमदारांना आपल्या बंडात बरोबर घेण्याची त्यांची तयारी झाली. (नंतर प्रत्यक्षात बारा आमदार आले) सभागृहातून भुजबळ हे त्यांच्या साथीदार आमदारांसह अचानक बेपत्ता झाले. ते सर्व कुठे गेले याची शोधाशोध सुरू झाली. त्यांच्या बंडाने शिवसेनाप्रमुखही जाम भडकले होते. त्या सर्व बंडखोर आमदारांची नागपूर जवळ असलेल्या पाटबंधारे विभागाच्या अतिथिगृहात व्यवस्था केली होती. तिथे कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. तिथे कुणीही पोहोचू शकणार नाही अशी दक्षता घेण्यात आली होती. तिथे भुजबळांसह सर्व अस्वस्थ होते. शिवसेनेत बंड करून आणि शिवसेनाप्रमुखांना आव्हान देऊन मुंबईत राहणे हे सोपे नाही, हे सर्वांनाच ठाऊक होते. एकदा तरी बाळासाहेबांनी मला छगन म्हणून हाक मारावी असे स्वत: भुजबळ काकुळतीला येऊन सांगत होते, पण शिवसेनाप्रमुखांनी त्यांचा फोनही घेतला नाही आणि त्यांच्याशी शब्दही बोलले नाहीत. मग मात्र काँग्रेस पक्ष आणि शदर पवारांचे छत्र याशिवाय त्यांच्यापुढे कोणताच पर्याय उरला नाही. पुढे शिवसेनाप्रमुखांनी त्यांना लखोबा म्हणून कायमचे संबोधले पण काँग्रेसने मंत्रीपदाच्या मखरात बसवल्यावर भुजबळही शिवसेनाप्रमुखांना टी. बाळू असे उपहासात्मक बोलू लागले. ज्यांनी त्यांना दोन वेळा महापौर, आमदार केले त्यांच्याशीच भुजबळांनी पंगा घेतला. शिवसेनाप्रमुखांना बऱ्याच वर्षांपूर्वीच्या भाषणाबद्दल अटक करण्याचाही आराखडा रचला. ज्यांनी त्यांना मोठे केले, त्यांनाच जेलमध्ये पाठवायला भुजबळ आतुर झाले होते. पण न्यायालयानेच केस पहिल्या फटक्यात फेटाळून लावली.*

*आज तेहतीस वर्षांनंतर हेच भुजबळ, जहाँ नही चैना, वहाँ नही रहेना असा सूर आळवत आहेत. तेव्हा बाळासाहेब ठाकरेंच्या विरोधात आणि आज अजितदादा पवारांच्या विरोधात ते तोफा डागत आहेत. तेव्हा विधानसभेचे विरोधी पक्षनेते पद मिळाले नाही म्हणून आणि आता महायुतीच्या नव्या सरकारमध्ये मंत्रीपद मिळाले नाही म्हणून ते आक्रोश करीत आहेत. तीन दशकांपूर्वी त्यांनी बंड केले तेव्हा शरद पवारांची ताकद त्यांच्या पाठीशी होती. जुलै २०२३ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये शरद पवारांच्या नेतृत्वालाच त्यांनी आव्हान दिले तेव्हा अजितदादांचे वलय आणि भाजपाचे संरक्षक कवच त्यांच्याबरोबर होते. आता भुजबळांनी अजितदादांच्याच विरोधात बंडाचा झेंडा फडकवला आहे, पण त्यांच्या पाठीशी नेमके कोण आहे, हे गूढ आहे. आपल्याला मंत्री करावे म्हणून स्वत: देवेंद्र फडणवीस आग्रही होते असे ते वारंवार सांगत आहेत. तसेच हम एक है तो सेफ हैं अशी पंतप्रधान नरेंद्र मोदींची निवडणुकीतील आवडती घोषणा देत आहेत. त्यांना भविष्यात कोणाकडून काय किंमत मिळेल हे ठाऊक नाही पण अजितदादांना त्यांनी डोकेदुखी निर्माण केली आहे.*

# मुख्यमंत्र्यांचे संकेत; तीन महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका?

## कार्यकर्त्यांच्या नोंदणीचे ‘टार्गेट’ : पदाधिकारी, नेत्यांनी भाषणवीर होण्यापेक्षा कार्यवीर व्हावे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३ नागपूर :-** विधानसभा निवडणुकीतील दणदणीत विजयानंतर भारतीय जनता पक्षाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी तयारी सुरू केली आहे. विशेष म्हणजे गत पावणेतीन वर्षांपासून राज्यातील अनेक निवडणुका रखडल्या असून, राजकीय पक्षांना २२ जानेवारी रोजी सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकांवरील सुनावणीची प्रतीक्षा आहे. मात्र, प्रत्यक्षात ४ जानेवारी रोजीच सुनावणी होण्याची शक्यता असून, तीन महिन्यांत निवडणुका व्हायला हव्यात, असा प्रयत्न असल्याचे वक्तव्य करीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या निवडणुकांबाबत संकेतच दिले आहेत.

नागपुरात भाजप कार्यकर्त्यांच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी फडणवीस यांनी ‘मन की बात’ मांडली. विधानसभेतील विजयामुळे कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे आणि भाजपसाठी ‘फेव्हरेबल’ वातावरण आहे. त्यामुळेच याचा फायदा उचलून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत विजयाचे पक्षाकडून नियोजन सुरू करण्यात आले आहे. यादृष्टीनेच नवनियुक्त मंत्री, आमदार यांच्या उपस्थितीत नागपुरात कार्यकर्त्यांच्या सदस्य नोंदणी प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.



विधानसभेतील विजयामुळे सरकार, लोकप्रतिनिधी व पक्षावरील जबाबदारी वाढली आहे. सर्वांनी जबाबदारीने वागणे अपेक्षित आहे. सरकार व जनतेदरम्यान संघटनेमार्फत समन्वय राहावा असा भर राहणार आहे. तिघांमध्येही योग्य समन्वय असला तर काय होऊ शकते हे विधानसभेतील निकालांतून समोर आले आहे. भाजपचे कार्यकर्ते निवडणुकीत अक्षरश: जादूगारच झाले होते, असे प्रतिपादन फडणवीस यांनी केले.

**प्रत्येक बूथवर दीडशे नोंदणीचे ‘टार्गेट’**

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये विजय मिळवायचा असेल तर काही दिवसांत सदस्यता नोंदणीवर भर द्यावाच लागेल. राज्यात दीड कोटी सदस्यता नोंदणी व्हायला हवी. प्रत्येक बूथवर दीडशे सदस्यांच्या नोंदणीचे टार्गेट असायला हवे. ५ जानेवारी रोजी सर्व पदाधिकारी-कार्यकर्ते जनतेत गेले व ५० जणांची नोंदणी केली तर ५० लाखांचा टप्पा काही तासांत गाठला जाऊ शकतो, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांनी रस्त्यांवर उतरून जनतेत गेले पाहिजे. केवळ भाषणे देऊन दुसऱ्यांवर काम ढकलण्याचे प्रकार करू नका, असे फडणवीस यांनी यावेळी बजावले. त्यावेळी मंचावर विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे, राष्ट्रीय सहसंगठन महासचिव शिवप्रकाश, सचिव अरविंद मेनन, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री पंकजा मुंडे, रणधीर सावरकर, प्रदेश उपाध्यक्ष संजय भेंडे, ड. धर्मपाल मेश्राम आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

### लोकप्रतिनिधींचे अप्रत्यक्षपणे टोचले कान

यावेळी फडणवीस यांनी त्यांच्या शैलीत अप्रत्यक्षपणे लोकप्रतिनिधी व पक्षातील पदाधिकाऱ्यांचेदेखील कान टोचले. पक्ष संघटनेत केवळ ठरावीक कार्यकर्ते, जिल्हे यांचाच पुढाकार दिसता कामा नये. पदाधिकारी, नेत्यांनी भाषणवीर होण्यापेक्षा कार्यवीर व्हावे ही अपेक्षा आहे. अधिवेशनाच्या सहा दिवसांत जे भेटायला आले त्यातील ९५ टक्के कार्यकर्त्यांना केवळ फोटो काढायचे होते. मात्र, आता कामावर भर द्या. जेव्हा सत्ता असते तेव्हा लोकप्रतिनिधी व संघटनेत अंतर येते. संघटना हे आपले शस्त्र असून, ते धारदारच असले पाहिजे. त्यामुळे संघटनेशी योग्य समन्वय असलाच पाहिजे. तर संघटनेतील पदाधिकाऱ्यांनीदेखील आम्ही म्हणू तसेच लोकप्रतिनिधींना वागले पाहिजे, असा आग्रह ठेवू नये. त्यांचादेखील सन्मान ठेवला पाहिजे, असे फडणवीस म्हणाले.

# कोबीवर्गीय पिकांसाठी सामान्य सल्ला, जाणून घ्या

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक**

सध्याचे थंड आणि मधूनच ढगाळ होणारे वातावरण मावा प्रादुर्भावास अनुकूल आहे. हिरव्या किंवा काळ्या रंगाचे मावा कोवळ्या पानातील अन्नरसाचे शोषण करतात. त्यामुळे पाने सुरकुतल्यासारखी होऊन पिवळी पडतात आणि वाळून जातात.

मावा शरीरातून चिकट पदार्थ बाहेर टाकतात. हा पदार्थ पानावर साठून राहिल्याने पाने चिकट व तेलकट दिसतात. त्यानंतर या पदार्थावर काळी बुरशी वाढते. परिणामी, प्रकाश संश्लेषण क्रिया मंदावते. झाडांची वाढ खुंटून उत्पादनात घट येते.

**असे करा व्यवस्थापन**

मावा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीला पोहचल्यास, निंबोळी अर्क ५ टक्के किंवा कडूनिंबावर आधारित कीडनाशक अझाडिरॅक्टीन (३०० पीपीएम) ५ मि.ली. प्रति लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी.




या फवारणीमुळे मावा किडीचे प्रमाण कमी होते व मित्र किटकांचे संवर्धन होते.

जैविक कीटकनाशकांमध्ये व्हर्टिसिलीअम लेकॅनी किंवा मेटॅऱ्हायझीयम अँनिसोप्लीची २ ते २.५ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी.

गरज पडल्यास व जैविक नियंत्रण केले नसल्यास आणि प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या पुढे गेल्यास, रासायनिक कीटकनाशक मॅलॅथिऑन (५० ईसी) २ मि.ली. किंवा इमिडाक्लोप्रीड (१७.८ एसएल) ०.४ मि.ली. प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

– ग्रामीण मौसम कृषी सेवा आणि विभागीय कृषी सेवा केंद्र, इगतपुरी

# पिंक ई-रिक्षा’ योजनेसाठी दारिद्रेषेखालील, विधवा, घटस्फोटित महिलांना प्राधान्य



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३ अमरावती-** महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी आणि महिलांच्या रोजगारनिर्मितीस चालना देऊन त्यांना स्वावलंबी व आत्मनिर्भर बनविण्यासाठी राज्य शासनाने ‘पिंक ई-रिक्षा’ योजना राबविली आहे. विशेषतः दारिद्रेषेखालील, विधवा आणि घटस्फोटित महिलांना या योजनेसाठी प्राधान्य दिले जाणार आहे.

महिलांना रिक्षा खरेदीसाठी अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यानुसार लाभार्थ्यांना केवळ १० टक्के रक्कम भरावी लागणार असून २० टक्के अर्थसहाय्य राज्य सरकारकडून करण्यात येणार आहे. उर्वरित ७० टक्के रक्कम बँकांमार्फत कर्ज स्वरूपात उपलब्ध करून दिली जाणार आहे. जिल्हास्तरावर अग्रणी बँकांची यादी तयार करण्यात आली आहे, तसेच या बँकांसोबत करार देखील करण्यात आले आहेत. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या अधिवेशनात ही योजना चर्चेत आली होती. महिलांकडून या योजनेला चांगला प्रतिसाद मिळाल्याने योजनेचे महत्त्व अधोरेखित झाले आहे.

राज्यातील सर्व पात्र महिलांना ई-रिक्षा खरेदीसाठी आर्थिक सहाय्य देण्याच्या उद्देशाने पिंक ई-रिक्षा योजना राज्यभर लागू करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी बालविकास प्रकल्प अधिकारी कार्यालय व संरक्षण अधिकारी कार्यालय पंचायत समिती, बारामती यांच्याकडून आवाहन करण्यात आले आहे.

सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत प्रवास करताना महिलांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. महिलांना सुरक्षित प्रवासाची हमी आणि रोजगार उपलब्ध करून देण्याचा राज्य शासनाचा उद्देश आहे.महिलांच्या आर्थिक स्तरात सुधारणा करून त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी तसेच स्वयंरोजगारासाठी पिंक ई-रिक्षा योजना सुरू करण्यात आली आहे. महिलांना रिक्षा व्यवसायासाठी आर्थिक सहाय्य आणि इतर आवश्यक सुविधा पुरवून स्वावलंबी बनवणे या योजनेचा मुख्य हेतू आहे. बारामती तालुका संरक्षण अधिकारी युवराज गाढवे यांनी महिलांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.




# बाहेरगावी जाताना फ्रीज सुरु ठेवावा की बंद? कशी घ्याल काळजी

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक**

नवीन वर्षाची लवकरच सुरुवात होणार आहे. त्यामुळे नवीन वर्षाच्या सेलिब्रेशनसाठी अनेक जण बाहेरगावी फिरायला जाण्याचा विचार करत असतात. अशावेळी घरातून बाहेर जाताना घर सुरक्षित ठेवण्यासाठी आपण सगळी काळजी घेत असतो. घराची सेफ्टी, घरात पाळीव प्राणी असतील तर त्यांची काळजी, इतर इलेक्ट्रिकच्या वस्तूंची काळजी, अगदी स्वयंपाक घरातल्या गॅसची सुरक्षा देखील आपण बाहेरगावी जाताना बघतो.असे सगळे सुरक्षेचे प्रश्न तपासून बघत असताना किचनमधली महत्वाची वस्तु आपण विसरून जातो. ती म्हणजे फ्रीज. बाहेरगावी जाताना फ्रीजचं काय करावं हे न समजून आपण गोंधळून जातो. खूप दिवसांसाठी गावी किंवा फिरायला जाताना फ्रिज बंद ठेवावा की चालू ठेवावा? असंही प्रश्न अनेकवेळा आपल्याला पडत असतो. बंद केला तर त्यातील पदार्थ खराब होण्याची भिती असते. तर फ्रीज सुरू ठेवला तर वीज बिल अधिक येण्याची शक्यता असते. अशावेळी मग नक्की करायचं काय? यासाठी आम्ही आज तुम्हाला काही खास टिप्स सांगणार आहे. आपल्या प्रवासाचा कालावधी, फ्रिजमधील अन्नपदार्थ, आणि फ्रिजच्या कार्यक्षमतेवर या सगळ्या गोष्टी अवलंबून असतात. त्यामुळे त्या दृष्टीने नियोजन करणं गरजेचं असतं. त्यासाठी काय करता येईल हे आज आम्ही तुम्हाला सांगणार आहे.

**बाहेरगावी जाण्याचा कालावधी**

प्रवासाला जाण्याचा कालावधी काय आहे. हे आधी बघावं. तुम्ही जर २ ते ३ दिवसांसाठीच बाहेरगावी जाणार असाल तर या काळात फ्रीजमध्ये ठेवलेले पदार्थ ताजे राहू शकतात. त्यासाठी फार काळजी घेण्याची गरज पडत नाही. पण साधारणत: आठवडाभरासाठी तुम्ही फिरायला जाण्याचा प्लॅन करत असाल तर अशावेळी दुध, दही, भाज्या, फळे अशा गोष्टी खराब होण्याची शक्यता असते. त्यामुळे फ्रीजमध्ये देखील खराब पदार्थांचा वास भरतो. मग फ्रीजमधील खराब होण्यासारखे पदार्थ काढून फ्रीज बंद करून बाहेरगावी जाणं योग्य ठरतं.

**फ्रीजची क्षमता तपासून तापमान सेट करा**

फ्रिज सध्याच्या काळातील महत्वाची गोष्ट झाली आहे. त्यामुळे फ्रीज व्यवस्थित काम करत आहे का हे सतत तपासलं पाहिजे. तसंच त्याची साफसफाई देखील केली पाहिजे. जेणेकरून



त्यातले पदार्थ जास्त काळ टिकण्यास मदत होईल. तर डीप फ्रीजचं तापमान हे ऋतुमानाप्रमाणे बदलत राहिलं पाहिजे. १४ ते २० डिग्री सेल्सिअसपर्यंत हे तापमान असायला हवं. तर सध्या फ्रीजचं तापमान हे ४ ते ५ डिग्री पर्यंत ठेवावं. काही लोकांना सतत फ्रीजची उघडझाप करण्याची देखील सवय असते. यामुळे त्यात बॅक्टेरिया तयार होऊन त्यात ठेवलेल्या पदार्थांचा आरोग्यावर परिणाम होतो.

**फ्रीज बंद केल्याने विजेची बचत होते का?**अनेकांना असं वाटतं की अधूनमधून फ्रीज बंद केल्याने वीजेचे बचत होते. पण हा समज पूर्णपणे खोटा व चुकीचा आहे. कारण फ्रीज बंद करुन पुन्हा सुरू केल्यावर त्याचा कॉम्प्रेसर सुरु व्हायला प्रमाणापेक्षा जास्त वीज खर्च होत असते. त्यामुळे थोड्या दिवसांसाठी फिरायला जाताना फ्रीज बंद करून जाण्याची गरज नाही. फक्त फ्रीज स्वच्छ पुसून मग त्यात पदार्थ ठेवावेत. जेणेकरून पदार्थांचा वास त्यात भरणार नाही. तर फ्रीजरमध्ये साठवलेला बर्फ फ्रिज बंद ठेवल्यास वितळण्याची शक्यता असते, त्यामुळे फ्रीजरमधील इतर पदार्थ खराब होऊ शकतात.

# नायलॉन मांजा विक्री करणाऱ्या दोघांवर कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२अमरावती-** शासनाकडून प्रतिबंधीत नायलॉन मांजा विक्री करणाऱ्या दोघांवर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कारवाई केली. संकेत रामेश्वर अंबुलकर (वय २८, रा. गुजरी बाजार मोशी) व संतोष अयोध्याप्रसाद गुप्ता (वय ५४, रा. चुटे चौक, तळेगाव दशासर) अशी या प्रकरणातील आरोपींची नावे आहेत.

पोलीस अधीक्षक विशाल आनंद (भा.पो.से.), अमरावती ग्रामीण यांनी अमरावती घटकांतर्गत शासन प्रतिबंधीत नायलॉन मांजाचा वापर होवु नये याबाबत स्थानिक गुन्हेशाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांना मार्गदर्शन करून कारवाई करण्याबाबत सूचना निर्गमीत केल्या होत्या.त्या अनुषंगाने २१ तारखेला स्थानिक गुन्हेशाखेच्या पथकाने मोर्शी उपविभागात पोलीस स्टेशन मोर्शी हददीत गोपनिय



बातमीच्या आधारे मोर्शी येथील गुजरी बाजार येथे राहणारा संकेत रामेश्वर अंबुलकर याच्या लक्ष्मी झेरॉक्स नावाच्या दुकानातून शासनाकडून प्रतीबंधीत नायलॉन मांजाचे ५९ बंडल, किमत २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

तसेच १९ तारखेला स्थानीक गुन्हे शाखेच्या पथकाने चांदुर रेल्वे उपविभागात पोलीस स्टेशन तळेगाव दशासर हददीत गोपनिय बातमीच्या आधारे तळेगाव येथे राहणारा संतोष अयोध्याप्रसाद गुप्ता रा. चुटे चौक तळेगाव दशासर याचे श्रध्दा टॉइज नावाच्या दुकानातून शासनाकडून प्रतिबंधित नायलॉन मांजा चे २९ बंडल एकुण कि ६,३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. २३ डिसेंबर २०२४ — शहर/ग्रामिण


## अमरावती शहराच्या रखडलेल्या भुयारी गटार योजने करिता

# माजी मंत्री डॉ. सुनील देशमुख यांची उच्च न्यायालयात जनहित याचिका स्वीकृत

### चार आठवड्यात उत्तर सादर करण्याचे न्यायालयाने दिले शासनाला आदेश गेल्या पाच वर्षात योजनेची कामे पूर्णतः ठप्प

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.२३अमरावती–**
शहवासीयांच्या आरोग्या च्या दृष्टीने महत्त्वाच्या भुवारी गटार योजनेची कामे गेल्या पाच वर्षात पूर्णतः ठप्प पडली आहेत. नवीन निधी किंवा काम मंजूर करणे तर दूरच, पण २०१४ ते २०१९ या काळात मंजूर होऊन कार्यारंभ आदेश झालेली कामेही पूर्णत्वास नेण्यात प्रशासन व लोकप्रतिनिधी अपयशी ठरले आहेत. परिणामी, निद्रिस्त प्रशासनाला जागे करण्यासाठी माजी मंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी अमरावती शहरातील प्रथितयश विधिज्ञ अँड. प्रवीण पाटील यांच्या सहकायनि मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात रखडलेल्या भुयारी गटार योजनेच्या विषयावर महाराष्ट्र शासन, सचिव, पाणीपुरवठा व मलनिस्सारण, सचिव नगर विकास विभाग, कार्यकारी अभियंता मजीप्रा व आयुक्त महापालिका अमरावती यांना प्रतिवादी करून जनहित याचिका दाखल केली. याचिका न्या. नितीन सांबरे व न्या. वृषाली जोशी यांच्या पीठाने नुकतीच स्वीकृत केली. तसेच सर्वच प्रतिवादींना नोटीस बजावून चार आठवड्यांत उत्तर सादर करण्याचे आदेश दिले आहेत.मूळ योजनेचा आकृतिबंध १२३ कोटींचा भुयारी गटार योजना



१९९७ पासून सुरू झाली. मूळ योजनेचा आकृतिबंध हुत्र कोटी रुपयांचा होता. परंतु, यात ६६ टक्के म्हणजे ८२ कोटी निधी हा एकटचा महापालिकेला उभा करायचा होता. यासाठी मनपाद्वारे हडकोकडे कर्ज प्रस्ताव सादर केला. परंतु हडकोच्या अटी शर्तीची पूर्तता न होऊ शकल्याने हडकोद्वारे कर्ज पुरवठा नाकारण्यात आला. १९९९ मध्ये डॉ.देशमुख अमरावतीचे आमदार निवडूनआल्यानंतर वैधानिक विकास महामंडळाकडून प्राप्त एकूण ३४ कोटी रुपयांत योजनेचे कार्य प्रगतीपथावर नेण्यास सुरुवात केली.

### निष्क्रिय जनप्रतिनिधींमुळे रखडली भुयारी गटार योजना



निष्क्रिय लोकप्रतिनिधी ढिम्म प्रशासन यांची टोकाची अनास्था पाहता आता ही रखडलेली भुयारी गटार योजना उच्चन्यायालयाने बड़गा उगारल्या शिवाय पूर्णत्वास जाणार नाही याची पूर्णतः खात्री झाल्यानेच आता न्यायालयीन लढा लढून शासनाला योजना पूर्णत्वास नेण्यास बाध्य करू, असे प्रतिपादन डॉ. देशमुख यांनी या जनहित याचिकेच्या माध्यमातून केले आहे. यापूर्वीही त्यांनी माध्यमातून अमरावती शहरातील बेलोरा विमानतळाच्या विकासासाठी याचिका दाखल केली होती.

### योजनेसाठी पहिल्या टप्प्यात मिळाले ३४ कोटी रुपये

डॉ. देशमुख यांच्या पाठपुराव्यामुळे तत्कालीन केंद्रीय नगरविकास मंत्री जयपाल रेड्डी यांनी या अनुषंगाने २००८ मध्ये १४१.९३ कोटी रुपयांची योजना मंजूर करून पहिल्या टप्याचे ३४ कोटी वितरित केले होते. या योजनेत केंद्र शासनाचे अनुदान ८० टक्के राज्य व लोकवर्गणी अनुक्रमे १० टक्के असा आकृतिबंध तयार केला होता. तिसऱ्या टप्यात अमरावतीमध्ये काम मंजूर करून कामाला सुरुवात करण्यात आली. दुर्दैवाने पुढे योजना परत रखडली. परंतु रडत पडत का होईना २०१४ सालापर्यंत काही अंशी काम पूर्ण झाले होते. आता ते निधीअभावी पूर्णतः रखडले आहे.

# नवनीत राणांनी केले मोहन भागवत यांचे स्वागत



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती,**
७माजी खासदार नवनीत राणा यांनी महानुभाव आश्रमाच्या शतकपूर्ती सोहळ्याला भेट देऊन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांचे स्वागत करून त्यांच्याकडून आशीर्वाद घेतले.महानुभव आश्रम शतकपुर्ती सोहळा समितीच्या वतीने परमपुज्य कारंजेकर मोहनदास बाबा यांच्या पावन हस्ते सरासंघचालक मोहन भागवत व माजी खासदार नवनीत रवी राणा यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. कोंडेश्वर भानखेडा रोडवरील १०० वर्षापूर्वी महानुभव आश्रमाची स्थापणा करण्यात आली होती. २०२४ या वर्षांत महानुभव आश्रमाला १०० वर्ष पुर्ण झाल्याबद्दल महानुभव आश्रम शतकपुर्ती सोहळा समितीच्या वतीने विविध धार्षिक – आध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रसाद बांधणी, अभिषेक, सन्या दिक्षाविधीव भव्यदिव्य महोत्सवाचे आयोजन २० ते २२ डिसेंबर या दरम्यान करण्यात आले आहे. महानुभव आश्रमातील परमपुज्य कारंजेकर मोहनदास बाबा यांचे आशीर्वाद नेहमीच नवनीत रवी राणा घेत असतात. यावेळी महानुभव आश्रमाला १०० वर्ष पूर्ण झाल्या निमित्य भव्य शतकपूर्ती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्य सरसंघचालक मोहन भागवत यांनी सुद्धा या सोहळ्याला भेट दिली. यावेळी नवनीत राणा यांनी सरसंघचालक मोहन भागवत यांचे स्वागत केले व आशीर्वाद घेतला. या सोहळ्यासाठी प.पु. उपाध्य कृष्णाचार्य वर्धनस्त बीडकर बाबा, कविश्वर कुळाचार्य खामणीकर बाबा, प.पु. कविश्वर कुळाचार्य दर्यापूरकर बाबा, प.पु. कविश्वर कुळाचार्य विदवांस बाबा, प.पु. कविश्वर कुळाचार्य लोणारकर बाबा, प.पु. कविश्वर कुळाचार्य श्री.साळकर बाबा, रिद्धपुरकर बाबा, यक्षादेवबाबा शास्त्री, पैठणकर बाबा, गुफेकर बाबा, कोठी बाबा, अमृते बाबां, जामोदेकर बाबा, मेहेकर कर बाबा, लासुरकर बाबा आदि उपस्थित होते.

# महाविकास आघाडीजवळ अनुभवी नेते पण ते कौशल्य दाखवू इच्छीत नाहीत

## पत्रकार लेखक सुनील तांबे यांचे प्रतिपादन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**
राज्यातील विधानसभा निवडणुकीत महायुतीने नियोजनबध्द तेसेस ध्येयनिश्चीती आणि धनशक्तीच्या बळावर विजय मिळवला आहे. महाविकास आघाडीजवळ अनुभवी नेते असूनही ते कौशल्य दाखवू इच्छीत नाहीत. यामुळेच निवडणुकीत महायुतीला बळ मिळाले, असे प्रतिपादन पत्रकार लेखक सुनील तांबे यांनी केले.

हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या स्व. सोमेश्वर पुसतकर सभगृहात रविवारी संध्याकाळी स्व दत्तात्रय पुसतकर शिक्षण संस्था व व्याख्यानमालेचे समन्वयक अविनाश दुधे यांच्या संयुक्त विद्यमाने सोमेश्वर पुसतकर स्मृतीव्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला स्व.दत्तात्रय पुसतकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ विजय दरणे, सचिव श्रीकृष्ण बाळापुरे, अविनाश दुधे आदी उपस्थित होते. सुनील तांबे म्हणाले की, लोकसभा निवडणुकीत ४८ पैकी ३१ जागांवर महाविकास आघाडीचा विजय झालापरंतु विधानसभेत असे कायझाले की, महाविकास आघाडी कोणताही चमत्कार दाखवू शकली नाही. हा चिंतनाचा विषय आहे. आघाडी आणि युतीमध्ये केवळ एक टक्के मतांचे अंतर होते. याचा अर्थ हा आहेकी, एकनाथ शिंदे आणि








अजित पवार यांना लोक गद्दार समजत नाहीत. या निवडणुकीत महायुतीला २३३ आणि आघाडीला ५० जागा प्राप्त झाल्या. महायुतीला आघाडीपेक्षा १४ टक्के मते अधिक मिळाली. केवळ सहा महिन्याच्या प्रयत्नात त्यांनी हे यश मिळवले. संपूर्ण राज्यात महायुतीसाठी वातावरण चांगले होते. १९९५ नंतर महायुतीलाआश्चर्यजनक विजय प्राप्त झाला आहे. याचे खापर इव्हीएमवर फोडले गेले. परंतु सर्वोच्च न्यायालयाने इवीएमला विश्वसनीय सांगितले. महायुती सरकारने या निवडणुकीत ज्या मुद्दयांना प्राधान्य दिले होते, त्यामध्ये बेरोजगारी, शेतकऱ्यांची समस्या, विकास कामे यांचा समावेश होता. शिवसेनाव राकाँ मध्ये विभाजनावरुन राहुल नार्वेकर यांनी अनेकदा वक्तव्ये केली. त्यांना विधानपरिषद सभापती बनविण्यात आले तेव्हा काँग्रेस आणि राकाँच्या आमदारांनी त्यांना शुभेचछा दिल्या. लोकसभेत वन नेशन व इलेक्शनचा प्रस्ताव ठेववण्यात आला तेव्हा काँग्रेसने त्याला विरोध केला आणि शरद पवारांच्या राकोंने समर्थन केले. महायुतीने लाडकीबहीण योजनेच्या माध्यमातून परिवारांना लक्ष्य केले. सत्ता आल्यानंतर २१०० रुपये महिना देऊ असे आश्वासन दिले.हे देखील त्यांच्या यशाचे एक कारण आहे. कार्यक्रमाचे संचालन प्रा प्रा. गोविद तिरमनवार तसेच आभार डॉ. पी. आर. जाधव यांनी मानले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. विजय दरने यांनी केले. पाहण्यांचा परिचय अविनाश दूधे यांनी करुन दिला.

# आजपासून शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती व्याख्यानमाला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**
श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीच्या वतीने शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचा १२६ वा जयंती उत्सवानिमित्त आज सोमवार २३ डिसेंबरपासून तीन दिवसीय डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. मातोश्री विमलाबाई देशमुख सभागृहात सायंकाळी ६ वाजता या व्याख्यानमालेचे पहिले पुष्प ज्येष्ठ राजकीय विश्लेषक डॉ. प्रकाश पवार, कोल्हापूर हे 'डॉ. पंजाबराव देशमुखः नेतृत्त्व व विचार' या विषयावर गुंफतील. डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती व्याख्यानमालेचे हे चोविसावे वर्ष असून सोमवार २३ डिसेंबरला सायंकाळी ६ वाजता आयोजित डॉ. प्रकाश पवार यांचे व्याख्यान संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या डॉ. पंजाबराव देशमुख प्रादेशिक अर्थव्यवस्था नियमन केंद्र आणि संस्थेच्या संयुक्त वतीने आयोजित करण्यात आली



आहे. श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्या अध्यक्षतेत आयोजित या व्याख्यानाला संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या आंतरविद्याशाखेच्या अधिष्ठाता मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहतील तर व्याख्यानमाला समितीचे अध्यक्ष व संस्थेचे उपाध्यक्ष अॅड.जे.व्ही.पाटील पुसदेकर प्रामुख्याने उपस्थित राहतील. श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती हे डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती व्याख्यानमालेचे आयोजक असून मातोश्री विमलाबाई देशमुख सभागृहात २३, २४ व २५ डिसेंबरला सायंकाळी ६ वाजता ही व्याख्याने होतील. २४ डिसेंबरला 'उच्च शिक्षण सद्यस्थिती आणि आव्हाने' या विषयावर डॉ. डी.एन. मोरे, नांदेड यांचे व्याख्यान होईल. २५ डिसेंबरला सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. राजन गवस, कोल्हापूर हे 'डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषिविचार आणि कृषिक्रांती' या विषयावर तिसरे व शेवटचे पुष्पा गुंफतील. अमरावतीकर जनतेने या व्याख्यानमालेला उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेचे सचिव सचिव डॉ.वि.गो. ठाकरे आणि व्याख्यानमाला समितीचे सचिव प्राचार्य डॉ. अंबादास कुलट यांनी केले आहे.

# थंडीला लागणार 'ब्रेक', हवामान खात्याचा पावसाचा अंदाज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३नागपूर :**
राज्यात डिसेंबरच्या पूर्वार्धात कडाक्याची थंडी पडली. राज्यातील अनेक शहरांमध्ये किमान तापमानाचा पारा चार ते पाच अंश सेल्सिअसवर पोहचला. गोठवणाऱ्या थंडीमुळे ठिकठिकाणी शेकोट्या पेटलेल्या दिसून येत होत्या, पण आता या थंडीचा जोर काहीसा ओसरत चालला आहे. राज्यातील किमान तापमानात वाढ झाली आहे आणि आता हवामान खात्याने चक्क पावसाची शक्यता वर्तवली आहे.

राज्यात नुकतेच नागपूर येथे हिवाळी अधिवेशन पार पडले. अधिवेशनाची सुरुवातच कडाक्याच्या थंडीने झाली. त्यामुळे या थंडीची सवय नसलेल्या आणि राज्यातून वेगवेगळ्या भागातून आलेल्या राजकीय, शासकीय व्यक्तींना ही थंडी चांगलीच बाधली. अधिवेशनाच्या पूर्व संध्येला नागपुरात सात अंश सेल्सिअस इतके किमान तापमान नोंदवले गेले. तीन ते चार दिवस थंडीचा जोर कायम होता, तर अधिवेशन संपताना अखेरचे दोन दिवस हा जोर काहीसा ओसरला. आता हवामान खात्याने हा जोर आणखी ओसरणार असून पावसाची शक्यता वर्तवली आहे.

बंगालच्या उपसागरात तयार झालेला कमी दाबाचा पट्टा येत्या काही तासात पुढे सरकणार असून पूर्व-

राज्यातील काही भागात गारठा कायम असला तरी कमाल तापमानात वाढ झाली आहे. राज्यात किमान तापमानात वाढ झाली असून तापमानाचा पारा काहीसा वाढलाय. मुंबईत कुलाबा आणि सांताक्रूझमध्ये किमान तापमान २० अंशांवर गेले. नाशिक येथेही १२ ते १८ अंश सेल्सिअसवर होते.

इशान्येकडे दाब वाढणार आहे. परिणामी इशान्येकडील राज्यांमध्ये पावसाला पोषक वातावरण तयार झाले आहे. याचाच परिणाम महाराष्ट्राच्या तापमानावर होणार असून पुढील दोन दिवसात राज्यात काही भागात पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. किमान तापमानात वाढ झाली असून विदर्भात येत्या २४ व २५ डिसेंबरला हलक्या ते मध्यम सरींची शक्यता वर्तविण्यात आली आहे. मराठवाडा, मध्य महाराष्ट्रातही आर्द्रता वाढणार असून काही भागात वातावरण ढगाळ राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे आता कडाक्याच्या थंडीला ब्रेक मिळणार असून तापमानात काहीशी वाढ होणार असल्याचे हवामान विभागाने सांगितले आहे.गेल्या काही दिवसात हाडे गोठवणारी थंडी होती. त्यावेळी चार ते पाच अंश सेल्सिअस वर असणारे किमान तापमान आता ११ ते १५ अंश सेल्सिअसवर पोहचले आहे. राज्यातील काही भागात गारठा कायम असला तरी कमाल तापमानात



वाढ झाली आहे. राज्यात किमान तापमानात वाढ झाली असून तापमानाचा पारा काहीसा वाढलाय. मुंबईत कुलाबा आणि सांताक्रूझमध्ये किमान तापमान २० अंशांवर गेले. नाशिक येथेही १२ ते १८ अंश सेल्सिअसवर होते. तर नागपुरात देखील तापमान १६ अंश सेल्सिअसवर पोहचले होते पण शनिवारपासून ते पुन्हा कमी होत ११ अंश सेल्सिअसवर आले आहे. चंद्रपूर, गोंदिया आदी शहरात देखील तापमानात वाढ झाली आहे.

# चुकीच्या समजुतीतून धर्माच्या नावाखाली अत्याचार- सरसंघचालक मोहन भागवत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३ अमरावती –** धर्म हा समजावून सांगावा लागतो, तो जर नीट समजला नाही, तर त्या धर्माच्या अर्धवट ज्ञानाने अधर्म होतो. जगामध्ये धर्माच्या नावाखाली जितके अत्याचार झाले आहेत, ते याच चुकीच्या समजुतीमुळे झाले आहेत, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी रविवारी येथे केले. येथील कंवरनगर परिसरातील महानुभाव आश्रमाच्या स्थापनेला शंभर वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने गेल्या तीन दिवसांपासून भानखेड येथील गोविंद गुरुकुलमध्ये विशेष कार्यक्रम सुरु आहे.

या विशेष कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी डॉ. मोहन भागवत बोलत होते. डॉ. मोहन भागवत म्हणाले, थोड्याशा ज्ञानाने खूप फुगलेल्या माणसाला ब्रम्हदेव देखील समजावू शकत नाही, असे सुभाषितामध्ये म्हटले आहे. अशा प्रकारे समजूत काढणे फार जिकिरीचे काम आहे, त्याला समजावयाला जावे, तर समाज म्हणतो, हा चुकीचा आहे, याला हाकला. याला मारा, याला ठोका.समाजाचे हे सर्व सहन करून समजावावे लागते. म्हणून तो धर्म समजावून सांगण्याचे काम करणारे संप्रदाय असावे लागतात. नुसते पंथ असून चालत नाहीत, तर त्याला विवेक आवश्यक असतो. ज्या पंथाला विवेक प्राप्त होतो, तो पंथ चांगला समाज घडवतो, असे डॉ. मोहन भागवत म्हणाले. महानुभाव पंथ आणि संघाचे आध्यात्मशक्तीचे हे कार्य व्यापक स्वरूपात जोमाने सुरू राहील, असेही त्यांनी सांगितले.सुमारे दहा वर्षांपुर्वी डॉ. मोहन भागवत हे महानुभाव पंथाच्या वतीने रिद्धपूर येथे आयोजित कार्यक्रमाला उपस्थित होते, त्यावेळी मंचावरून व्यक्त झालेल्या मतांचा संदर्भ देत डॉ. भागवत म्हणाले, अगदी पहिल्यांदा मी या स्थानावर आलो होतो, त्यावेळी असे सांगण्यात आले की, ८०० वर्षांनंतर हिंदू समाजाने आम्हाला आपले म्हटले आहे. ही गोष्ट माझ्या मनाला लागली. हे बरोबर नाही, असे मला वाटले. समाजाचे कुठले अंग, ज्याकडे ८०० वर्षे पाहिलेच गेले नाही, हा अन्यायच आहे, अशी खंत डॉ. मोहन भागवत यांनी व्यक्त केली.अशा प्रकारच्या कार्यक्रमांना यायला हवे, हे माझ्या मनात तेव्हापासून होते, हे सर्व ऋणानुबंध असतात, अशा भावना देखील त्यांनी व्यक्त केल्या. संस्कृती आचरणात आणण्यासाठी जगात वेगवेगळे पंथ, संप्रदाय आहेत. अनेक प्रकारचे पंथ, संप्रदाय, रीतीरिवाज या विविधतेला वेगळे मानता प्रेम, भक्ती निर्माण करावी, असे आवाहनही भागवत यांनी केले.






# अचलपूर येथे कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र(कुसुम) मोहीम संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अचलपुर** :- तालुका आरोग्य अधिकारी अचलपूर व उपजिल्हा रुग्णालय परतवाडा अचलपूर याच्या संयुक्त विद्यमाने सहाय्यक संचालक आरोग्य सेवा (कुष्ठरोग)अमरावती कार्यालय व डॉ किरण शिंदे तालुका आरोग्य अधिकारी अचलपूर व डॉ सुरेन्द्र ढोले वैद्यकीय अधीक्षक उपजिल्हा रुग्णालय परतवाडा/अचलपूर यांचे मार्गदर्शनाखाली कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र ( कुसुम) मोहीम दिनांक १६ डिसेंबर ते २० डिसेंबर२०२४ या कालावधीत राबवण्यात आली .

राष्ट्रिय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम अंतर्गत नियमित सर्वेक्षणात तपासणी न होणाऱ्या व्यक्ती म्हणजेच वसतिगृह राहणारे विद्यार्थी, आश्रम शाळा, बांधकाम मजूर,वीटभट्टी कामगार, गिट्टी खदान कामगार, संत्रा तोडमंडी कामगार,,याचे आरोग्य विभाग मार्फत तपासणी करण्यात आली.

शहरातील व ग्रामीण शासकीय आदिवासी मुला, मुलींचे वसतिगृहातील विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात येऊन कुष्ठरोगविषयी सर्व सामान्य लक्षणे म्हणजेच फिक्कट किंवा लालसर न खाजनार न दुखणारा बधीर चट्टा,, तेलकट गुडगुडीत व चमकदार चेहरा,जाड कानाच्या पाळ्या,हातापायचे बोटा मध्ये मुग्या येणे,अशक्तपणा येणे,तसेच आजाराबाबत काळजी कशी घ्यावी याबाबत माहिती व तपासणी देण्यात आली . सदर मोहीम यशस्वी करण्याकरिता जिल्हा पर्यवेक्षक दिपक गडलिंग,, तालुका स्तर प्रवीण दातीर कुष्ठरोग तंत्रज्ञ, श्रीमती निता इंगोले , अवैद्यकीय सहायिका,अचलपूर तसेच वैद्यकीय अधिकारी डॉ सुधीर माहुरे, डॉ प्रवीण कोरडे , डॉ लेखिका गाडबैल ,डॉ राधिका सूर्यवंशी ,डॉ वैष्णवि आस्तुलकर , डॉ प्रीती काबरा , आणि सर्व समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सेविका, आरोग्य सेवक , आशा गटप्रवतिका, आशा यांनी मोलाचे योगदान देऊन मोहीम यशस्वी केली .



# पोलीस आयुक्तालयाने पटकाविली जनरल चॅम्पियनशिप

## अमरावती परिक्षेत्रीय पोलीस क्रीडा स्पर्धा



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अमरावती :** अमरावती परिक्षेत्रीय पोलीस क्रीडा स्पर्धेची जनरल चॅम्पियनशिप शहर पोलीस आयुक्तालयाने पटकावली. अमरावती परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे यांच्या हस्ते प्रभारी पोलीस आयुक्त गणेश शिंदे व पोलीस उपायुक्त कल्पना बारवकर यांनी संघासह ती ट्रॉफी उंचावली. या स्पर्धेत अमरावती परिक्षेत्रातील एकूण ८७४ महिला व पुरुष पोलीस खेळाडूंनी सहभाग घेतला होता.

अमरावती ग्रामीण पोलीस दलाच्या यजमानपदाखाली १५ डिसेंबरपासून ३५ वी अमरावती परिक्षेत्रीय पोलीस क्रीडा स्पर्धा सुरू झाली होती. या स्पर्धेत हॉकी, फुटबॉल, हॅण्डबॉल, व्हॉलीबॉल, खो-खो, कबड्डी, ॲथलेटिक्स, जलतरण, कुस्ती, बॉक्सिग, वेटलिफ्टिग, ज्युडी, तायक्कांदो, वुशू, क्रॉसकंट्री, पॉवरलिफ्टिंग व बॉडी बिल्डिंग या खेळांचा समावेश होता. या स्पर्धेचा बक्षीस वितरण व समारोपीय समारंभ २० डिसेंबर रोजी विशेष पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे यांच्या हस्ते येथील जोग स्टेडियम येथे विजेते खेळाडू व संघांचा गौरव करून पार पडला. याप्रसंगी जिल्हाधिकारी सौरभ कटियार, अमरावती एसआरपीएफचे समादेशक राकेश कलासागर, वाशीमचे पोलिस अधीक्षक अनुज तारे, यवतमाळचे पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अकोल्याचे अपर पोलीस अधीक्षक गणेश लोखंडे व परिक्षेत्रातील वरिष्ठ पोलीस अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. यावर्षी स्पर्धेदरम्यान पहिल्यांदा सर्व घटकांतील बॅण्ड पथकांची स्पर्धासुद्धा घेण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पोलीस अधीक्षक विशाल आनंद तर आभार प्रदर्शन अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांनी केले.या स्पर्धेत परिक्षेत्रातून निवड करण्यात आलेल्या २५० खेळाडूंना फेब्रुवारी २०२५ मध्ये होणाऱ्या ३५ व्या महाराष्ट्र राज्यस्तरीय पोलीस क्रीडा स्पर्धेत अमरावती परिक्षेत्राचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली आहे.

# संत गाडगेबाबांनी समाजाबरोबर लोकांची मने स्वच्छ केली

## डॉ. संतोष देव महाराज यांचे प्रतिपादन, संत गाडगेबाबा राष्ट्रीय सन्मान सोहळा उत्साहात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अमरावती** संत गाडगेबाबा विज्ञानवादी दृष्टिकोन ठेवणारे संत होते. अंधश्रद्धा, कर्मकांड बुवाबाजी यावर कीर्तनाच्या मध्यानातून प्रहार करत त्यांनी आयुष्यभर समाजप्रबोधन केले.स्वच्छतेचे पूजक असलेले संत गाडगेबाबांनी समाजाबरोबर लोकांनी मने सुद्धा स्वच्छ केली असे प्रतिपादन शिवधारा आश्रमचे संस्थापक डॉ. संतोषदेव महाराज यांनी केले. संत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्य आयोजित राष्ट्रीय सन्मान सोहळ्याच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. शुक्रवारी संत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त पुज्य शिवधारा आश्रम व शब्दप्रभु मासिक यांच्या संयुक्त विद्यमाने संत गाडगेबाबा स्मृती राष्ट्रीय जीवन गौरव व सेवा सन्मान पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता.पुज्य शिवधारा आश्रम येथील सभागृहात डॉ श्री संतोष देव महाराज यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्याला उद्धाटक म्हणून डॉ पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मुती वैद्यकीय महाविद्यालय अमरावती येथील अधिव्याख्याता डॉ अनिल देशमुख हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून श्री कृष्ण मंदिर देवस्थान माता खिडकी अमरावतीचे अध्यक्ष सुभाष पावडे , शब्दप्रभु मासिकाचे संपादक गोपाल उताणे आदी मान्यवर विचारपीठावर विराजमान होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते संत गाडगेबाबा स्मुती राष्ट्रीय सेवा सन्मान पुरस्कार, भालचंद्र बिजवे, विलास साखरे, अमोल चवणे, सुभाष तलडा, वासुदेव किष्ननानी, मुकेश हरवानी, मुकुंद मोरे,नानकराम नेभनानी, आणि लप्पीसेठ जाजोदिया यांना सन्मानपूर्वक बहाल करण्यात आला.शाल, सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते.डॉ अनिल देशमुख यांनी आपल्या भाषणात पुरस्कार प्राप्त सर्व सेवाव्रतींच्या कार्याचा गौरव करत त्यांना शुभेच्छा दिल्या. त्यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले.सुभाष पावडे यांनी आपल्या मनोगतात संत गाडगेबाबा स्मुती राष्ट्रीय सेवा सन्मान पुरस्कार आयोजन समितीच्यावतीने आयोजित केलेल्या उपक्रमांचे कौतुक केले व शुभेच्छा दिल्या तसेच संत श्री संतोष देव जी महाराज संस्थापक शिवधारा आश्रम यांचा भावपूर्ण सत्कार केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शब्दप्रभु मासिक सह संपादक सौ.मंजुषा उताणे यांनी केले, याप्रसंगी संयोजीका सौ.योगीता बोंडे उपस्थित होत्या, आयोजन समिती सदस्य जुगलकिशोर गट्टानी,दादासाहेब टोपले लक्ष्मणराव ढवळे रुपमसिंग सुर्यवंशी,रंगरावजी कडु महाराज, डॉ उज्वला ढेवले,पल्लवी गुलालकर, हर्षा सगणे कुमारी कोमल उताणे व मोठ्या संख्येने मान्यवर उपस्थित होते, संत गाडगेबाबा यांच्या गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला या भजनाने समारोप झाला.



# नायलॉन मांजाने दुचाकीस्वार तरुणीचा गळा चिरला

## बेलपुरा परिसरातील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अमरावती** :नायलॉन मांजाने दुचाकीस्वार तरुणीचा गळा चिरून ती जखमी झाली. ही घटना शनिवार, २१ डिसेंबर रोजी सायंकाळी ६.१५ वाजताच्या सुमारास राजापेठ ठाण्याच्या हद्दीतील बेलपुरा मार्गावर घडली. जखमी तरुणीवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

एक तरुणी ही शनिवारी सायंकाळी दुचाकीने घरून चिंचफैल परिसरातील एका मंदिरात दर्शनासाठी जात होती. मार्गात अचानक नायलॉन मांजा आडवा येऊन तिच्या गळ्याजवळ अडकला. तरुणीने मांजा बाजूला करण्याचा प्रयत्न केला. त्याचवेळी दुचाकी घसरून ती खाली पडली. तर मांजा आवळून तिचा गळा चिरल्या गेला. त्यात ती जखमी झाली. हा प्रकार परिसरातील नागरिकांच्या लक्षात आल्यावर त्यांनी तिला रुग्णालयात दाखल केले. तिच्यावर उपचार सुरू आहे.या प्रकरणी पीडित तरुणीने राजापेठ ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीवरून अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

# कार्यालयांमध्ये अंतर्गत तक्रार निवारण समिती गठित करणे आवश्यक

## महिला व बाल विकास विभागाचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अमरावती**, कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळापासून प्रतिबंध करण्यासाठी कार्यालयाअंतर्गत तक्रार निवारण समिती गठित करणे आवश्यक आहे. यामध्ये सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालय, खाजगी क्षेत्र, इंटरप्राईजेस, सहकारी संस्था, क्रीडा संकुल, प्रेक्षागृह, मॉल्स, अशासकीय संघटना, ट्रस्ट, रुग्णालय, क्रीडा संस्था, वाणिज्य, शैक्षणिक, औद्योगिक कार्यालय अथवा संस्थेत दहा किंवा दहापेक्षा जास्त कर्मचारी असल्यास तक्रार निवारण समिती गठित करणे बंधनकारक आहे. अंतर्गत समिती स्थापन न करणाऱ्या कार्यालयांचा परवाना रद्द किंवा व्यवसाय पुढे सुरु ठेवण्यास मज्जाव करण्यात येईल, असे निर्देश जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी दिले आहे.

कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळापासून संरक्षण (संरक्षण, प्रतिबंध आणि मनाई) अधिनियम-२०१३ अंतर्गत तक्रार समितीमध्ये किमान पाच सदस्य असावेत. समितीची अध्यक्ष महिलाच असावी. समितीमध्ये ५० टक्केपेक्षा जास्त महिलांचा समावेश असावा. समितीत एका अशासकीय सदस्याचा समावेश असावा.या अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी व कार्यवाही करण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी जिल्हा ते तालुकास्तरावर संबंधित अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, गर्ल्स हायस्कुल जवळ, कॅम्प रोड, महिला व बालविकास भवन, अमरावती येथे अंतर्गत तक्रार निवारण समिती गठित केल्याचा अहवाल सादर करावा व तसे प्रमाणपत्र कार्यालयाकडून प्राप्त करुन घ्यावे. सदर प्रमाणपत्र माहे डिसेंबर २०२४ च्या वेतन देयकासोबत जोडणे बंधनकारक आहे. तरी सर्व कार्यालयांनी तात्काळ अंतर्गत तक्रार निवारण समितीचा अहवाल जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांच्याकडे सादर करावा. या कार्यालयाचा ई-मेल पत्ता वुलवेरीरींरींळसारळश्र.लो हा असून तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले आहे.



# मेळघाट मधील कोलकास येथील हत्तीच्या महावत,चारा कापी चे पदे रिक्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३मेळघाट**



मेळघाट व्याघ्र प्रकल्प व वन विभागाच्या दिमतीला व पर्यटकांसाठी आता आकर्षणाचा केंद्र ठरलेल्या कोलकास येथील येथील चार हत्तीणींच्या दिमतीला आवश्यक असलेले महावत, चारा कापीची पदे रिक्त असून, रोजंदारी मजुरांच्या भरवशावर त्यांची देखभाल सुरू आहे. ही पदे भरण्याची मागणी आदिवासी संघटनेने केली आहे

दहा वर्षांपासून शासकीय हत्तींणींची देखभाल, संवर्धन-संरक्षण व दुर्गम भागातील जंगलामध्ये गस्त, पर्यटकांना पाठीवर बसवून फिरवणे, वाघाचा मागोवा यासारखी अनेक कामे रोजंदारी मजूर करीत आहेत. दहा वर्षांपासून चारा कापी पदभरती होत नसल्यामुळे रोजंदारीवर अल्प मजुरीने काम करणाऱ्यांवर त्याची जबाबदारी आहे. एकीकडे मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत कोट्यवधी रुपयांचा खर्च, विकासात्मक कामे यासह वृक्ष, वन्यप्राणी यांच्या सुरक्षेसाठी केला जात आहे.

दुसरीकडे मेळघाट वन विभागाच्या अखत्यारीतील सुंदरमाला, जयश्री, चंपाकली व लक्ष्मी या चार हत्तींणींकरिता कर्मचारी भरती केली गेली नाही. त्यामुळे तत्काळ हत्तीणींच्या सेवेकरिता कर्मचाऱ्यांची भरती वजा मागील दहा वर्षापासून अल्प मजुरीवर काम करणाऱ्या रोजंदारी कर्मचाऱ्यांना कायम करण्याची मागणी आदिवासी संघटनेच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व व्याघ्र प्रकल्पाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना करण्यात आली आहे.

### गडचिरोलीत भरती, मेळघाटात ठेंगा!

एलिफंट गाइडलाइननुसार प्रत्येक हत्तीणीला एक महावत व एक चारा कापी असणे आवश्यक आहे. परंतु कोलकास येथे पाच चारा कापीचे पट रिक्त आहे. गडचिरोली जिल्हा निवड समितीच्या माध्यमातून चारा कापी पदभरती प्रक्रिया सुरु आहे. ती प्रक्रिया मेळघाटमध्येही राबविण्याची मागणी संघटनेच्या वतीने एका निवेदनातून करण्यात आली आहे. मात्र त्यावर अद्याप कुठलाही निर्णय झालेला नाही.

# ४ जानेवारीला स्व. माणिकराव घवळे स्मृती राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धा

## राजकीय स्वार्थासाठी दिल्या जाणाऱ्या योजना लोकशाहीस घातक आहे या विषयावर होणार स्पर्धा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

स्व.माणिकराव घवळे स्मृती प्रतिष्ठान आणि डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. माणिकराव घवळे स्मृती राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धा शनिवार दि. ४ जानेवारी २०२५ रोजी आयोजित करण्यात आली आहे.

राजकीय स्वार्थासाठी दिल्या जाणाऱ्या योजना लोकशाहीस घातक आहे या विषयावर ही स्पर्धा रंगणार आहे. ४ जानेवारी २०२५ रोजी डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाच्या सभागृहात सकाळी १०:३० वाजता या स्पर्धेला प्रारंभ होईल.

या स्पर्धेचे फेसबुक, युट्यूब च्या माध्यमातून थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे. स्पर्धेत विजेता संघाला स्व. माणिकराव घवळे स्मृती फिरता चषक प्रदान करण्यात येईल.विषयाच्या अनुकूल व प्रतिकूल बाजूस मते मांडणाऱ्या दोन स्पर्धाचा संघ स्पर्धेसाठी पात्र ठरेल. स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविणाऱ्या



संघाला ११००१ रु. रोख, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र आणि फिरता चषक देऊन गौरविण्यात येईल. वैयक्तिक गटात प्रथम क्रमांक पटकावणाऱ्याला ७००१ रु. रोख सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र, द्वितीय पारितोषिक ५००१ रु. रोख सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र, तृतीय पुरस्कार ३००१रोख सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येणारआहे. तर उत्तेजनार्थ पारितोषिक म्हणून २००१ रु रोख व प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे. या स्पर्धेचे हे २३ वे वर्ष असून, स्पर्धेच्या माध्यमातून महत्वपूर्ण विषयावर मत मांडण्याची संधी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना प्राप्त होणार आहे. विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र येथील नावाजलेले वादविवादपटू या स्पर्धेचे परीक्षण करणार आहेत. ही स्पर्धा नि:शुल्क असून अधिकाधिक विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग घ्यावा असे आवाहन प्राचार्य डॉ. वर्षा देशमुख, संयोजक प्रफुल्ल घवळे व आयोजकांतर्फे करण्यात आले आहे. अधिक माहितीकरीता डॉ. शीतलबाबू तायडे, ९८२२५२७८०८, डॉ. अमित गावंडे९४२२९४३२९८, प्रा. रणजित देशमुख ९९७५७७८१८, मयुर चौधरी ७७९८०६०५००, रत्नाकर शिरसाट ८८५७९११०३६ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# थर्टी फर्स्टला तळीरामांची चांदी! पहाटेपर्यंत मिळणार दारू; आदेश नेमका काय?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

नव्या वर्षाचं स्वागत करण्यासाठी सर्वच जण सज्ज झाले आहेत. ३१ डिसेंबरला थर्टी फर्स्ट जल्लोषात साजरा करून रात्री बाराच्या ठोक्याला नव्या वर्षाचं स्वागत केलं जातं. पार्टीचाही बेत असतोच. लाखो लिटर दारू अन् बिअर रिचवली जाते. असाही सगळा रागरंग



असतोच. या जल्लोषात आता सरकारी आदेशाची भर पडली आहे. अर्थात हा आदेश तळीरामांच्या आनंदात भर घालणाराच आहे. नवीन वर्षाच्या स्वागताच्या निमित्ताने राज्यातील दारुची दुकाने, पब, बार पहाटेपर्यंत सुरू राहणार आहेत. परंतु, कायदा आणि सुव्यवस्था, सार्वजनिक शांततेचा विचार करून परवानगी नाकारण्याचा अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना आहे असेही स्पष्ट करण्यात आले आहे.






# थंडीत वाढले 'चिअर्स'; डॉ.म्हणतात हृदयाची काळजी घ्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

थंडीच्या दिवसांत अनेक मद्यप्रेमी मद्य प्राशन करण्यास पसंती देतात. मागील काही दिवसांची दारू विक्रीची आकडेवारी बघितल्यास दारूची विक्री वाढल्याचेही दिसून येते. मात्र, अति मद्य प्राशन करणे आरोग्यास धोकादायक आहे. त्यामुळे शक्यतो दारूचे व्यसन टाळावे, असा सल्ला तज्ज्ञ डॉक्टरांनी दिला आहे.

हिं वाळ्यात 'बॉडी टेंपरेचर' कमी झाल्याने आपला सिम्पेथेटिक नर्व्हस सिस्टम ॲक्टिव्ह होतो आणि कॅटेकोलामाइनचा स्राव वाढू शकतो. यामुळे रक्तवाहिन्या आकुंचन पावतात. ज्यामुळे हार्ट रेट, ब्लड प्रेशर, कोलेस्ट्रॉलचे प्रमाण आणि रक्ताच्या गाठी तयार होण्याची प्रक्रिया वाढू शकते. यामुळे हार्ट अटॅकचा धोका वाढतो. त्यातच आपण अधिक मद्य प्राशन केल्यास ही लक्षणे वाढण्याची शक्यता अधिक असते, असे हृदयरोग तज्ज्ञ डॉ. प्रमेश गायधने यांनी सांगितले. थंडीत वाइन किंवा रम पिणे चांगले असते, असा चुकीचा गैरसमज अनेकांना झाला आहे. भारतातील अभ्यासात असे कुठेही प्रूफ झाले नसल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. त्यामुळे मद्यशौकिनांनी हिवाळ्यात चिअर्स करताना आपल्या आरोग्याची काळजी घेण्याची गरज आहे. अन्यथा ते आपल्याच जीवावर बेतू शकते त्यामुळे मद्यशौकिनांनी काळजी घेण्याचा सल्ला हृदयरोग तज्ज्ञांनी दिला आहे.



थंडीमध्ये वाइन, रम पिणे चांगले असते असा गैरसमज करून अनेकजण थंडीत जास्त दारू पितात. मात्र, भारतीय अभ्यासात कुठेच थंडीत दारू पिणे चांगले असते हे प्रूफ झाले नाही. थंडीत दारू पिल्याने हृदयरोग होण्याची लक्षणे मोठ्या प्रमाणात वाढत असतात. कोणतेही व्यसन हे हृदयासाठी घातकच आहे.
**डॉ. नीरज राघानी हृदयरोग तज्ज्ञ,**

**थंडीत अशी घ्या हृदयाची काळजी**

हिवाळ्यात हृदयाशी निगडित समस्याही वाढू शकतात. त्यामुळे या काळात आरोग्याची विशेषतः हृदयाची नीट काळजी घेणे आवश्यक असते.

पुरेशी झोप घ्यावी, दिवसातून किमान एक तास व्यायाम, योगा करावा, मीठ व साखरेचे सेवन प्रमाणात घ्यावे. फास्टफूड व तेलकट पदार्थ खाणे टाळावे.

**दारूविक्री मोठ्या प्रमाणात वाढली**

थंडीत दारू किंवा रम पिणे चांगले असते असा चुकीचा समज पसरला आहे. त्यामुळे अनेकजण थंडीत अधिक दारू पितात.

मागील काही दिवसांत जिल्ह्याच्या तापमानात प्रचंड घट झाली आहे. त्यामुळे अनेकजण दारू पिण्याला पसंती देत आहेत. परिणामी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात दारू, रम, वाइनची विक्री वाढली आहे.

**अल्कोहोलचा हृदयावर परिणाम**

अधिक दारू प्यायल्याने हृदयाचे ठोके अनियमित होतात. दीर्घकाळ मद्यप्राशन केल्याने हृदयावर परिणाम होत असतो.अल्कोहोलचा परिणाम हृदय, किडनी, यकृतावर होण्याची शक्यता असते.

# आदिवासी युवतीच्या पोटातून काढला दोन किलोचा गोळा

## धारणी उपजिल्हा रुग्णालयात यशस्वी शस्त्रक्रिया

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३धारणी**

धारणी तालुक्यातील भोकरबर्डी येथील एका आदिवासी युतीच्या गर्भाशयाची जटिल व गुंतागुंतीची शस्त्रक्रिया उपजिल्हा रुग्णालयात यशस्वी करण्यात आली. तिच्या पोटातून तब्बल २ किलो ३०० ग्रॅम वजनाचा गोळा काढण्यात डॉक्टरांना यश आले.



धारणी उपजिल्हा रुग्णालय प्रशासनाच्या वतीने मिळालेल्या माहितीनुसार, भोकरबर्डी येथील रहिवासी पुष्पा भिलावेकर (२३, रा. भोकरबर्डी) हिच्या गर्भाशयामध्ये गोळा असल्याचे वैद्यकीय तपासणीमध्ये निष्पन्न झाले होते. पुष्पाला तिच्या कुटुंबीयांनी खासगी रुग्णालयामध्ये शस्त्रक्रिया करण्यासाठी घेऊन गेले असता, विविध रुग्णालयांनी नकार दिला. यानंतर धारणी उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. वैद्यकीय अधीक्षक डॉ. दयाराम जावरकर यांच्या मार्गदर्शनाखाली महात्मा ज्योतिराव फुले आरोग्य योजनेंतर्गत डॉ. प्रदीप विश्वास,डॉ. जामकर, डॉ. श्रेया मोरे यांच्या चमूने यशस्वीरीत्या शस्त्रक्रिया करून पुष्पा भिलावेकर हिच्या गर्भाशयातून हा गोळा काढला शस्त्रक्रियेकरिता आरोग्य मित्र राहुल तिवारी, गौतम धोडपकर सुशील तिवारी, भूषण पवार यांनी वैद्यकीय अधिकाऱ्यांना सहकार्य केले.

# विद्यापीठाच्या हिवाळी-२०२४ च्या काही परीक्षांच्या वेळापत्रकात बदल : विद्यार्थ्यांनी नोंद घेण्याचे विद्यापीठाचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या हिवाळी-२०२४ लेखी परीक्षेची वेळापत्रके विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहेत. सदर वेळापत्रकातील काही परीक्षांच्या वेळापत्रकात दुरुस्ती/सुधारित/नवीन वेळापत्रक जाहीर करण्यात येत आहे.

ज्या परीक्षांच्या वेळापत्रकांमध्ये बदल करण्यात आलेले आहेत, त्यामध्ये बी.सी.ए. सेमि.-५ (सी.बी.सी.एस.), बी.फार्म सेमि.-१ (सी.बी.सी.एस.), बी.टेक.सेमि.-३ (एन.ई.पी.) (केमिकल टेक्नॉलॉजी अॅन्ड एफ.पी.ओ.पी.सी.), बी.एड्. सेमि.-३ (नवीन), डिप्लोमा इन सायबर सेक्युरिटी एस.-१ अॅन्ड २ (सी.बी.सी.एस.), डिप्लोमा इन अप्लाईड



कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी एस.-१ अॅन्ड २ (सी.बी.सी.एस.), बी.ए. सेमि.-१ (एन.ई.पी.), बी.एस्सी. सेमि.-१ (एन.ई.पी.), बी.ई. (सर्व शाखा)/ बी.टेक. (केमिकल टेक्नॉलॉजी/ एफ.पी.ओ.पी.सी./ बी.टेक्स्ट. सेमि.-१ अॅन्ड २ एन.ई.पी., एम.एस्सी. (पर्यावरण विज्ञान) सेमि.-१ (एन.ई.पी.) सुधारित अभ्यासक्रम आणि बी.ई.सेमि.- ५ व ६ आणि ७ (सी.बी.सी.एस.) इलेक्टिव्हज पेपर्स या परीक्षांच्या वेळापत्रकांत बदल करण्यात आलेले आहेत. यासंदर्भात सर्वसंबंधित महाविद्यालये, प्राचार्य, केंद्राधिकारी, परीक्षा केंद्रांना परीक्षा विभागाकडून कळविण्यात आले असून महाविद्यालयांनी तातडीने आपल्या विद्यार्थ्यांना कळवायचे आहे. तरी विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी केले आहे. अधिक माहितीकरीता त्यांचेशी ९८५००४२३५७ या क्रमांकावर संपर्क साधता येईल, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

# शहरातील वर्दळीच्या भागात रत्यावर नॉयलॉन मांजाची दहशत : पतंग पकडण्यासाठी मुलेली पळतात सुसाट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

नायलॉन मांजावर बंदी असताना सर्रास विक्री केली जात आहे. शनिवारी एका तरुणीचा गळा चिरल्याची घटना घडली होती. त्यामुळे खडबडून जागे झालेल्या प्रशासनाने विक्रेत्यावर कारवाईचा फास आवळत अनेक दुकानातून मांजा जप्त केला. मात्र, अजूनही आकाशात उडणाऱ्या पतंगाला नायलॉन मांजीचाच ढील देण्यात येत असून, वर्दळीच्या रस्त्यावर या मांजाची वाहनधारकांत दहशत वाढत चालली आहे.

मकर संक्रांतीला पतंग उडविण्याची परंपरा आहे. मात्र, डिसेंबर महिन्याच्या प्रारंभापासूनच मुलांत पतंग उडविण्याची स्पर्धा लागली आहे. मुलांची मानसिकता ओळखून विक्रेत्यांनी विविध आकर्षक पतंग व मांजाने आपली दुकाने अंतर्गत सजवून विक्रीस उपलब्ध करून दिले आहे. नायलॉन मांजा हा जिवावर उठणारा ठरत असताना त्याला अटकाव घालण्यात यश आल्याचे दिसत नाही. आतापर्यंत अनेक नागरिकांचा गळा चिरला गेला असून, आकाशात उंच उडणाऱ्या पक्ष्यांचा बळीही या मांजाने घेतला आहे. पालकांकडे आग्रह धरून मुले



पतंग उडविण्यासाठी मोकळ्या मैदानात जाऊन उंच आकाशात ढील देतात. यात होणाऱ्या स्पर्धेत कापला गेलेला पतंग पकडण्यासाठी मुले सुसाट वेगात धावत सुटतात. मुख्य रस्त्यावर समोरून एखादे वाहन वेगात येत आहे याचेही भान बाळगले जात नाही. तर, तुटलेला नायलॉन मांजा हा वाहनचालकाच्या गळ्यात अडकण्याची भीतीही निर्माण होते. मुलांचे जत्थे रस्ते व मैदानात उभे राहून कुणाचा पतंग कापला जातो आणि तो मिळविण्याच्या प्रतीक्षेत असतात. तर, अनेक ठिकाणी मांजाही दिसतो. नागरिकांच्या जिवावर उठणाऱ्या नायलॉन मांजाच्या वापरावर बंदी आणण्यासाठी कडक पाऊल उचलण्याची मागणी वाहनचालकांकडून करण्यात येत आहे. पालकांनी मुलांच्या पतंगबाजीकडे गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

**पक्ष्यांचीही बळी**

नायलॉन मांजा मानवासह पक्ष्यांचाही जीवावर उठला आहे. दरवर्षी मांजामुळे शेकडो पक्षांचा बळी जात आहे. यामुळे यावर कायमस्वरूपी बंदी घालण्यात यावी, अशी मागणी पक्षिप्रेमींकडून करण्यात येत असून त्याची दखल घेणे आवश्यक आहे.

**पालकांनी द्यावे लक्ष**

आता शाळांना ख्रिसमसनिमित्त सुट्या लागणार आहे. शिवाय शनिवार व रविवारीही मुले पतंगबाजीचा मनमुराद आनंद लुटतात. ही मुले चोरट्या पद्धतीने नायलॉन मांजा तर वापरत तर नाही ना याकडे पालकांनी लक्ष दिल्यास अपघाताच्या घटना टळेल.

# जिंगल बेल्स... जिंगल बेल्स... जिंगल ऑल दी वे

## ख्रिसमस आधीच्या वीकेण्डमुळे बाजारात उत्साह शिगेला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

ख्रिसमस अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपल्याने ख्रिस्ती बांधवांनी रविवारी वीकेण्डची संधी साधून खरेदी करण्यासाठी शहरातील बाजारपेठांसह मॉलमध्ये गर्दी केल्याचे पाहायला मिळाले. विविध आकाराचे ख्रिसमस ट्री, सिरेमिक बाहुल्या, चांदण्या, झालर, स्नोमॅन, सोनेरी रंगांच्या घंटवाची माळ, एनल्स, चांदण्यांचे कंदिल, शुभेच्छा कार्ड, सांताक्लॉजची टोपी हेअरबँड, कपडे, ड्रम, मोजे आदी सजावटीचे साहित्य, तसेच चॉकलेट्स, केक आणि कपड्यांची त्यांनी मनसोक्त खरेदी



केली.शहरातील दुकाने ख्रिसमसनिमित्त सजली आहेत. येशू ख्रिस्तांच्या जन्माचा देखावा तयार करण्यासाठी अनेकांची लगबग सुरू आहे. बाजारात येशू ख्रिस्तांच्या जन्माचे रेडिमेड देखावेही मिळत असल्यानेअनेक ग्राहक ते खरेदी करण्याला प्राधान्य देत असल्याचे बाजारपेठेतील एका विक्रेत्याने सांगितले. अगदी २०० ते दोन हजार रुपयांपर्यंतचे देखावे बाजारात उपलब्ध आहेत. त्याचबरोबर ५० रुपयांपासून ते हजारो रुपयांपर्यंत सजावटीचे साहित्य मिळत आहे. नागरिकही मोठ्या आनंदाने साहित्य खरेदी करत आहेत.

**सांताक्लॉजचे मुखवटे, टोप्या अन् कापडी हेअर बॅण्ड**

ख्रिसमसनिमित्त सांताक्लॉजचे मुखवटे, टोप्या अन् कापडी हेजर बॅण्ड ४० ते ६० रुपयांपर्यंत मिळत आहेत. ख्रिसमस ट्री ७० रुपयांपासून ते दोन हजार रुपयांपर्यंत उपलब्ध आहेत. जपानी चेन ३० ते ६० रुपये, शोभीवंत माळा ३० ते १०० रुपये, मोठ्या आकारातील बेल १२० ते ४०० रुपयांपर्यंत उपलब्ध आहेत.

**फराळ, केक बनविण्याची लगबग**

ख्रिस्ती बांधवांच्या घरी रविवारी केक, विविध पद्धतींचा पारंपरिक फराळ तयार करण्याची लगबग सुरु होती. फराळासाठी लागणारे विविध जिन्नस, साहित्य खरेदीकडे महिलांचा कल दिसून आला.

**मेणबत्त्या, डिझायनर बेल्स**

ख्रिसमस स्पेशल मेणबत्त्या आणि डिझायनर बेल्सला मोठ्या प्रमाणात मागणी आहे. तसेच, अनेकांनी आठवडाभरापासूनच सांताच्या पायातील बुटाचा संच असलेली तोरणे, गिफ्ट्सचे बॉक्स गुंफून तोरणे तयार केली आहेत.

# यंदा आमरस जोरात, दरही कमी होणार

## कडाक्याच्या थंडीमुळे आंबेमोहोर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

अमरावती : संपूर्ण विदर्भात कडाक्याची थंडीत जाणवत असून ही थंडी आंब्याला मोहोर येण्यासाठी अनुकूल मानली जात आहे. उशिरापर्यंत झालेला पाऊस, पावसाळा संपल्यानंतरही जमिनीत टिकून राहिलेली ओल, कमी थंडी आणि ढगाळ वातावरण, पाऊस आदी प्रतिकूल स्थितीमुळे यंदा आंबा मोहोर येण्याची प्रक्रिया दोन-तीन टप्प्यांत होणार असल्याचे कृषी तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

अमरावती शहरात सोमवारी किमान ८.५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली, कमाल तापमान २९ अंश सेल्सिअस इतके नोंदवले गेले. विदर्भात सर्वत्र तापमान खाली घसरले आहे. आणखी तीन दिवस अशीच परिस्थिती राहील. २० डिसेंबरपर्यंत विदर्भात वातावरण कोरडे राहील. आंब्याला मोहोर येण्यासाठी अत्यंत अनुकूल वातावरण आहे. काही ठिकाणी फुट सुरू झाली आहे. पुढील आठ दिवसांत ५० टक्क्यांपेक्षा जास्त आंबा मोहोरण्याची



शक्यता आहे. सध्या आंब्याच्या बागेत कोणत्याही परिस्थितीत पाणी देऊ नये. तसेच मोहोर येण्यापूर्वी कीटकनाशक, बुरशीनाशक, तसेच अन्नद्रव्याची फवारणी केल्यास फायदा होईल. थंडी कमी होताच संत्रा बागेत फुट निघण्यासाठी वातावरण अनुकूल आहे. थंडीपासून बचाव करण्यासाठी संत्रा बागेत हलके पाणी देणे आवश्यक आहे. अती तडण दिल्याने झाडाचे आरोग्य बिघडते, अशी माहिती श्री शिवाजी कृषी महाविद्यालयाचे शेती व हवामान तज्ज्ञ प्रा. अनिल बंड यांनी दिली आहे.

आंबा बागेत ढगाळ वातावरणात नत्र वाढते, तर कर्बोदकांचे प्रमाण कमी होते. म्हणजे नवती निघून मोहोर निघणे थांबते. मोहोर आणि नवतीत निघण्याची स्पर्धा होते. मोहोर ताकदवान असेल तर पाने बारीक निघतात आणि मोहोर जरा बाहेर पडला की ती पाने गळून पडतात. मात्र, पाने ताकदवान असल्यास मोहोर कमकूवत होतो आणि बाहेर पडल्यानंतर तो गळून जातो. त्यामुळे मोहोर ताकदवान होण्यासाठी किंवा नवतीवर नियंत्रण मिळविण्यासाठी वाढ नियंत्रकाचा वापर करण्याचा सल्ला कृषी तज्ज्ञांनी दिला आहे.बागेमध्ये मोहोर येण्यासाठी थंडीची अत्यंत आवश्यकता असते. मात्र एकदा मोहोर आल्यानंतर थंडी कमी होणे अधिक फायद्याचे असते. मोहोर उमलताना जास्त थंडी पडल्यास (अगदी तापमान सात अंश सेल्सिअसपर्यंत खाली आल्यास) मोहोराच्या फुलांमधील परागकण वाहून नेणारी नलिका (पोलन ट्यूब) खराब होऊ शकते. त्यामुळे परागकण खाली गर्भागारापर्यंत जात नाहीत. त्यामुळे फळधारणा होण्यास अडथळा निर्माण होतो. पर्यायाने चांगला मोहोर येऊनसुद्धा फळधारणा अत्यंत कमी होते, असे तज्ञांचे म्हणणे आहे.

# २३ फेब्रुवारीला भारत-पाकिस्तान आमने-सामने

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३मुंबई**

आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी पुढील वर्षी फेब्रुवारी ते मार्च दरम्यान खेळवली जाणार आहे. यावेळीच्या हंगामाचे आयोजन पाकिस्तानकडे आहे. मात्र भारताने पाकिस्तानमधे जाण्यास नकार दिल्याने सामने हायब्रीड मोडवर खेळवण्यास पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने संमती दर्शवली आहे. यानंतर आयसीसीने स्पष्ट केले की ही स्पर्धा हायब्रीड मॉडेल अंतर्गत होणार आहे. यामध्ये भारत आपले सामने अन्य कोणत्या तरी देशात खेळणार आहे.

'पीटीआय'ने दिलेल्या माहितीनुसार, भारतीय संघ आपले



सर्व सामने दुबईत खेळणार आहे. अशा परिस्थितीत या मैदानावर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील महामुकाबलाही खेळवला जाणार आहे. भारतीय संघ अंतिम फेरीत पोहोचला, तर चॅम्पियन्स ट्रॉफीची उपांत्य फेरी आणि अंतिम फेरीही यूएईमध्येच होणार हे नक्की.

आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात पहिला सामना कधी होणार आहे. याची सर्वांनाच प्रतिक्षा आहे. 'इएसपीएन क्रिकइन्फो'ने दिलेल्या माहितीनुसार, भारत आणि पाकिस्तान २०२५ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये दुबईतील आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर आमनेसामने येणार आहेत. ड्राफ्ट वेळापत्रकानुसार हा सामना २३ फेब्रुवारीला होणार आहे.

# अटल दौड हाफ मॅरेथॉन राज्यस्तरीय स्पर्धेची तयारी अंतिम टप्प्यात

## तुषार भारतीय मित्र मंडळ व अमरावती जिल्हा अथलेटिक संघटनेचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न स्वर्गवासी अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीच्या निमित्ताने गुरुकुल बहुउद्देशीय शिक्षण संस्था व अमरावती जिल्हा अथलेटिक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित होणारी राज्यस्तरीय मॅरेथॉन स्पर्धा २५ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ५:४५ वा होणार असून या स्पर्धेची तयारी अंतिम टप्प्यात आली असून अल्पावधीतच लोकप्रिय झालेल्या या स्पर्धेची उत्कंठा आता शिगेला पोचली आहे.

अटलजींनी भारतावर आज जन्म प्रेम केले. भारताला यशाच्या उत्तुंग शिखरावर अरुण करण्यासाठी आयुष्यातील प्रत्येक क्षण वाचला प्रतिकूल परिस्थितीतही सतत झुंज देत भाजपाची विचारधारा समाजात रुजवली. आयुष्यात आलेल्या प्रत्येक जबाबदारीवर योग्य न्याय देत त्यांनी समाजाची सेवा केली. याच विशाल वटवृक्षाच्या समर्थ खांद्यावर भाजपाची वेल वाढली आज तोच वेलू गगनावर गेल्याच प्रत्यय आपण घेत आहोत. अशा या महान विभूतीचे स्मरण चिरकाल टिकावी, या उद्देशाने तुषार भारतीय मित्र परिवाराच्या वतीने स्वर्गवासी अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीच्या निमित्ताने राज्यस्तरीय हाफ मॅरेथॉन अटल दौड स्पर्धा आयोजित केली




### हाफ मॅरेथॉन स्पर्धाचा मार्ग

राज्यस्तरीय हाफ मॅरेथॉन अटल दौड स्पर्धा दसरा मैदान येथून प्रारंभ होऊन राजकमल चौक, राजापेठ कल्याण नगर, मोती नगर राजेंद्र कॉलनी, काँग्रेस नगर, पंचवटी चौक, शेगाव नाका, विलास नगर जुना कॉटन मार्केट, जयस्तंभ, जवाहर गेट, गांधी चौक, गौरक्षण चौक, भूतेश्वर चौक, रवी नगर, नवाथे चौक, राजापेठ, राजकमल आणि समारोप नेहरू मैदान होणार आहे.

आहे.राज्यस्तरीय हाफ मॅरेथॉन अटल स्पर्धेचे उद्घाटन समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते होणार असून स्पर्धेत धावण्यासाठी नोंदणी केलेल्या सर्व स्पर्धकांनी सकाळी ५:३० वा दसरा मैदान येथे उपस्थित रहावे.स्पर्धकांचा उत्साह वाढवण्यासाठी प्रत्येक चौकात नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन मुख्य आयोजक तुषार भारतीय यांनी केले आहे.

स्पर्धा यशस्वी होण्यासाठी विविध समित्यांचे गठन राज्यस्तरीय हाफ मॅरेथॉन अटल दौड स्पर्धा यशस्वी होण्यासाठी विविध समितीचे गठन करण्यात आले आहे. संयोजक, समन्वयक, तांत्रिक सहाय्यक वेब पोर्टल, शासकीय यंत्रणा समन्वय , शहर सौंदर्यकरण, निवास व भोजन व्यवस्था, प्रचार व प्रसार करिता कार्यालय सोशल मीडिया, मैदान व्यवस्थापन, वाहतूक व्यवस्था, मॅरेथॉन स्पर्धा दरम्यान प्रमुख चौकामध्ये स्वागत प्रमुख, नोंदणी प्रमुख सामाजिक संस्थेसोबत समन्वयक, कायदेविषयक टीम इत्यादी अनेक प्रकारच्या समितीचे गठन करण्यात आले आहे. अटल दौड स्पर्धा यशस्वी होण्यासाठी शेकडो कार्यकर्ते काम करीत आहे.


वयोगट(१) १४ वर्षाआतील मुले ३ किमी मुली ३ किमी(२) १६ वर्षाआतील मुले ५ किमी मुली ३ किमी(३) २० वर्षाआतील मुले ८ किमी मुली ५ किमी(४) ४० वर्षावरील पुरुष ५ किमी महिला ५ किमी(५) खुला वर्ग महिला/ पुरुष(Run For Fun) ३-किमी. खुला वयोगट(१) पुरुष व महिला १० किमी(२) पुरुष व महिला २१ किमी.

# जीव घातक झाले मुरुमाचे ओव्हरलोड ट्रक, हाय स्पीड वाहतूक

## महसूल प्रशासन बेखबर , खदान चालकांनी घातला हैदोस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३परतवाडा**

परसापूर ते बोराळा रस्त्यावरील खदानी वरून चालणाऱ्या मुरूमाच्या ओवरलोड ट्रकांची वाहतूक नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण करीत आहे महसूल प्रशासन यावर कानाडोळा करीत खदान चालकांनी घातलेल्या हैदोसची चांगली मजा पाहत आहे मुरूमाच्या खदानीवर ब्लास्टिंगचा उपयोग करून मुरुम काढण्यात येते विशाल काय पर्वताला फोडण्याकरिता ब्लास्टिंगचा उपयोग होतो यामुळे पर्यावरणाचा धोका निर्माण झाला आहे , महसूल प्रशासनाने खदानी वरून मुरूमची वाहतूक करण्यासाठी नियमावली खदान चालकांना दिली होती परंतु नियमावलीचा उल्लंघन करून ओवरलोड मुरूमच्या ट्रकाद्वारे रात्री चार वाजता पासून सुरू असलेल्या आवाजाहीमुळे रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे परसापूर ते बोराळा वरून गौरखेडा बाजार कडे जाणारा हा मार्ग नवनिर्वाचित मेळघाटचे



आमदार केवलराम काळे यांच्या गावाला जोडणारा आहे , या मुख्य रस्त्याची दुरवस्था अशी झाली आहे की खड्ड्यामध्ये या रस्त्याचा रूपांतर झाला आहे , थातूरमातूर पद्धतीने खड्डे विझविण्याचा काम काही दिवसापूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाने या रस्त्यावर केले होते परंतु मुरुमाच्या ओव्हरलोड ट्रकांच्या वाहतुकीमुळे पुन्हा या रस्त्याची दूरवस्था झाली आहे खदान चालकांवर शेवटी आशीर्वाद कोणाचा असा प्रश्न निर्माण होत आहे चक्क नागरिकांच्या जीवाशी खेळ खेळणाऱ्या खदान चालकांवरती महसूल प्रशासन चौकशी करून नेमकी कोणती कारवाई करते याकडे नागरिकांचे लक्ष केंद्रित झाले आहे

**कोऱ्या पासेस वर ओवरलोड मुरूमाची वाहतूक**

बोराळा येथील खदानीवरून मुरूमाची वाहतूक करण्यासाठी महसूल विभागाने खदान चालकांना नियमाप्रमाणे पासेसची बुक दिली होती परंतु कार्बन कॉपी वर पासेस रिकामी ठेवत चक्क रिकाम्या पासेस वरच बोराळा येथील खदानी वरून मुरुमाची वाहतूक अवैध पद्धतीने होत आहे , मुरुमाच्या वाहतुकीसाठी महसूल प्रशासनाने दिलेल्या नियमांचे उल्लंघन करून चालणाऱ्या ओवरलोड मुरूमाच्या वाहतुकीवर जिल्हा खडीकरण अधिकारी , चिखलदरा येथील तहसीलदार व महसूल प्रशासनाचे अधिकारी मुखदर्शी दिसत आहे

**आमदाराच्या गावाला जोडणाऱ्या मुख्य रस्त्याची अशी दूरवस्था**

परसापूर ते बोराळा वरून गौरखेडा बाजार कडे जाणारा हा मुख्य रस्ता सार्वजनिक बांधकाम विभाग अचलपूर यांच्या देखरेखित असून मेळघाटचे नवनिर्वाचित आमदार केवलराम काळे यांच्या गावाला जोळणारा आहे याच रस्त्यावरून आमदार साहेबांची सुद्धा आवाजही आहे परंतु मुरूमाच्या ओव्हरलोड ट्रकांची वाहतुकीने या रस्त्याचे खड्ड्यामध्ये रूपांतर केले आहे आमदार साहेब या अवैध खादानीला बंद कधी पडणार असा प्रश्न नागरिकांनी उपस्थित केला आहे

**महसूल विभागाचे तपासणी नाके फक्त कागदावरच**

चिखलदरा तहसील प्रशासनाने ४ डिसेंबर पासून परसापूर रस्त्यावर वेगवेगळ्या दिवशी मंडळ अधिकारी व पटवारी यांची तपासणी करण्याकरिता भरारी पथकाला नियुक्त करण्यात आले होते परंतु या रस्त्यावरील भरारी पथकाचे कर्मचारी बेपत्ता असल्यामुळे अवैध पद्धतीने उत्खनन करून ओवरलोड मुरूमांच्या ट्रकाची वाहतूक खुलेआम होत आहे खदान चालकांवर व ट्रक मालकांवर महसूल विभागाचे हे कसे आशीर्वाद असा प्रश्न या रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकांच्या मनामध्ये उपस्थित होत आहे

**आरटीओ विभाग गार झोपेत**

बोराळा येथील खदानीवर अवैध पद्धतीने होत असलेल्या उत्खनावरूनटिप्पर पासून तर ओव्हरलोड ट्रक भर दिवसा वाहतूक करीत आहे या अधिक तर टिप्पर व ट्रकांचा परमिट , फिटनेस , व इन्शुरन्स कालावधी समाप्त झाल्यावरही अवैध स्वरूपात टिप्पर व ट्रक मालक खदानी वरून ओवरलो ट्रकांची वाहतूक करीत आहे वाहनाची कागदपत्री तपासण्याचे काम आरटीओ विभागाचे आहे खुलेआम सुरू असलेल्या या तमाशावर आरटीओ विभाग सुद्धा गप्प दिसत आहे पथ्रोट पोलीस स्टेशनचे वाहतूक कर्मचारी यांची गाडी मालकांसोबत मिलीभगत असल्यामुळे ही अवयव वाहतूक सुरू असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगली आहे.

# प्रजासत्ताक दिनाच्या संचलनात १५ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांचे चित्ररथ; मात्र या यादीत महाराष्ट्राला तूर्तास स्थान नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३नवी दिल्ली**

विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या झोळीत मतांचे भरभरून दान टाकणार्या महाराष्ट्राच्या चित्ररथाला आगामी प्रजासत्ताक दिन सोहळ्यातील संचलनात परवानगी मिळालेली नाही. २६ जानेवारी २०२५ रोजी राजपथ म्हणजेच कर्तव्यपथावरील प्रतिष्ठेच्या संचलनासाठी यंदा १५ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांचे चित्ररथ निवडण्यात आले. या यादीत महाराष्ट्राला तूर्तास स्थान मिळालेले नसल्याचं समोर आलं आहे.

मात्र आतापर्यंत म्हणजे १९७१ पासून ते २०२३ पर्यंत महाराष्ट्राला १४ वेळा उत्कृष्ट चित्ररथासाठी पारितोषिक मिळाले आहे. आतापर्यंत एकूण ७ वेळा महाराष्ट्राच्या चित्ररथाला पहिले पारितोषिक, तर ४ वेळेस दुसरे पारितोषिक आणि २ वेळेस तृतीय पारितोषिक मिळाले आहे. एकदा लोकप्रिय चित्ररथ यामध्ये पहिले पारितोषिक मिळाले आहे. सलग तीन वर्षी सर्वोत्तम चित्ररथाचे पहिले पारितोषिक पटकविण्याचा विक्रमही (हॅटट्रिक) राज्याच्या नावावर जमा आहे. अशातच या वर्षी या यादीत महाराष्ट्राला तूर्तास स्थान मिळालेले नसल्याने अनेक चर्चा रंगू लागल्या आहे.

**१९७१ पासून महाराष्ट्राच्या चित्ररथाला १४ वेळा पारितोषिक, सात वेळा पहिला पुरस्कार**

सर्वप्रथम १९८१ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यभिषेकाच्या चित्ररथास प्रथम पारितोषिक मिळाले. १९८३ मध्ये बैलपोळा या चित्ररथासही प्रथम पारितोषिक मिळाले. यानंतर १९८६ मध्ये भारतीय स्वातंत्र्य संग्रामात महाराष्ट्राचे योगदान या संकल्पनेवर आधारित चित्ररथास दुसरे पारितोषिक, तर १९८८ मध्ये लोकमान्य टिळकांचा ऐतिहासिक खटला या संकल्पनेवर आधारित



चित्ररथास दुसरे पारितोषिक मिळाले. यानंतर १९९३ मध्ये लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी सुरु केलल्या सार्वजनिक गणेश उत्सवाचे शताब्दी वर्ष या चित्ररथास पहिले पारितोषिक, तर १९९४ मध्ये हापूस आंबा या चित्ररथासही पहिले पारितोषिक मिळाले. १९९५ मध्ये बापू स्मृती या चित्ररथासही पहिले पारितोषिक मिळाले आणि सलग तीन वर्षे चित्ररथास पुरस्कार मिळवून महाराष्ट्राने पारितोषिकांवर आपली आघाडी सिध्द केली आहे.

२००७ मध्ये जेजुरीचा खंडेराया या चित्ररथास तिसरे पारितोषिक, तर २००९ मध्ये धनगर या चित्ररथास दुसरे पारितोषिक मिळाले. २०१५ मध्ये पंढरीची वारी या चित्ररथास पहिले पारितोषिक, तर २०१७ मध्ये लोकमान्य गंगाधर टिळक यांनी दिलेल्या 'स्वराज्य माझा जन्मसिध्द हक्क आहे' या घोषणेचा शताब्दी महोत्सव तसेच सार्वजनिक गणेशोत्सव अभियानाची १२५ वर्षे या चित्ररथास तृतीय पारितोषिक मिळाले. २०१८ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक सोहळा या चित्ररथास प्रथम पारितोषिक मिळाले, तर २०२२ मध्ये महाराष्ट्राची जैवविविधता व राज्य मानके या चित्ररथास सर्वात लोकप्रिय चित्ररथाचे पहिले पारितोषिक मिळाले. आता २०२३ मध्ये महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठे आणि नारीशक्ती या चित्ररथाला सर्वोत्तम चित्ररथाचे दुसरे पारितोषिक मिळाले आहे.

सन २०२४ या वर्षाच्या प्रजासत्ताक दिन नवी दिल्ली चित्ररथ संचलनात २८ राज्य आणि सात केंद्रशासित प्रदेश यांच्याकडून विकसित भारत आणि भारत लोकशाहीची जननी या दोन संकल्पनांवरती विविध राज्यांना आपल्या चित्ररथाच्या संकल्पना सादर करण्यास केंद्र शासनाने कळविले होते. यास अनुसरून विविध विषयांवर केंद्र शासनास संकल्पनांचे सादरीकरण करण्यात आले होते. छत्रपती शिवाजी महाराज यांचे ३५० वे शिवराज्याभिषेक वर्षानिमित्त शिवराज्याभिषेकाचा ३५० वा महोत्सव आणि लोकशाहीची प्रेरणा या विषयांची सांगड घालून लोकशाहीचे प्रेरणास्थान: छत्रपती शिवाजी महाराज या संकल्पनेवर आधारित सादरीकरण संरक्षण मंत्रालयास करण्यात आले होते.